



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १०७ * नांदेड * गुरूवार, दि. २३ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# महाराष्ट्रात पुढील चार दिवस पावसाचे

## मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्याला येलो अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात पुढील चार दिवसात वादळी वाऱ्यासह पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता असल्याचे हवामान शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी सांगितलं आहे. राज्यात आजपासून पुढील ४ दिवस दक्षिण विदर्भ, मराठवाडा मध्य महाराष्ट्राला पावसाचा येलो अलर्ट असल्याचं सानप यांनी सांगितलं. दुसरीकडे साताऱ्यात आणि पुण्यात मुसळधार पाऊस आणि गारपीट झाली आहे. सातारा शहरात आणि ग्रामीण भागात पावसानं हजेरी लावली. उकाड्यामुळं त्रस्त झालेल्यांनी या पावसात भिजण्याचा आनंद घेतला.

हवामान शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार आजपासून पुढील ४ दिवस पावसाचे असतील, याकाळात वादळी वाऱ्यासह गारपीटही होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यातील काही जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता असल्याचं सानप यांनी सांगितलं.



भारतीय हवामान विभागानं आजपासून पुढील ४ दिवस दक्षिण विदर्भ, मराठवाडा मध्य महाराष्ट्राला पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे. या भागात वादळी पाऊस होणार असल्याचा अंदाज पुणे हवामान विभागानं वर्तवला आहे. हवामान विभागानं सांगली, सोलापूर, सातारा, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, बीड, चंद्रपूर, यवतमाळमधील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. एका बाजूला पाऊस तर दुसऱ्या बाजूला विदर्भातील बहुतांश जिल्ह्याचा तापमानाचा पारा ४० च्या पुढे राहणार असल्याची माहिती पुणे हवामान विभागाने दिली आहे.

बुधवारी सातारा शहरासह ग्रामीण भागामध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळल्याने काही वेळ नागरिकांची तारांबळ उडाली. दिवसभराच्या कडक उन्हाने आणि उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना या पावसाने मोठा दिलासा दिला. अचानक आलेल्या पावसामुळे रस्त्यावर धावपळ उडाली, तर काही ठिकाणी गारांचा मोठा पाऊस झाला ढगांच्या गडगडात विजेचा कडकडासह अचानक आलेल्या पावसाने सर्वांची तारांबळ उडवली. मात्र गर्मीने त्रस्त झालेल्या नागरिकांनी या पावसाचा आनंद घेत भिजण्याचा मनमुराद आनंद लुटला. लहान मुलांसह नागरिकांनी पावसामध्ये भिजण्याचा आनंद लुटला आहे. अवकाळी पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला असून तापमानातही घट झाली आहे.

## नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांना धक्का; गृहमंत्र्यांचा महिन्याभरातच राजीनामा

**काठमांडू (वृत्तसंस्था)–** नेपाळमध्ये एका महिन्यांपूर्वी बालेन शाह यांच्या पक्षाचं सरकार सत्तेत आलं. निवडणुकीतील विजयानंतर ३५ वर्षीय बालेन शाह हे नेपाळचे पंतप्रधान झाले. दिग्गज नेत्यांचा पराभव करून सत्तेत आल्यामुळे बालेन शाह यांची मोठी चर्चा झाली. एवढंच नाही तर बालेन शाह यांनी नेपाळच्या पंतप्रधान पदाची सूत्रं हाती घेतल्यापासून अनेक मोठे निर्णय घेतले. त्यामुळे जगभरात बालेन शाह यांची मोठी चर्चा सुरू होती. असं असतानाच अवघ्या एका महिन्याभरातच बालेन शाह हे अडचणीत आले आहेत.

बालेन शाह यांच्या सरकारच्या काही निर्णयाविरोधात नेपाळमधील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून हजारो नागरिकांकडून निदर्शने करण्यात येत आहेत. यातच नेपाळचे गृहमंत्री सुदान गुरुंग यांच्यावर विरोधकांकडून आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले आणि यावरून राजकीय वाद निर्माण झाला. या वादानंतर अखेर आज (२२ एप्रिल) गृहमंत्री सुदान गुरुंग यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. अवघ्या एका महिन्यात गृहमंत्र्यांवर राजीनामा देण्याची वेळ आल्यामुळे पंतप्रधान बालेन शाह यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रसने दिलं आहे.

दरम्यान, सुदान गुरुंग यांनी गृहमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. 'लोकांच्या विश्वासापेक्षा दुसरं काहीही महत्त्वाचं नाही', अशी प्रतिक्रिया गुरुंग यांनी दिली.

गेल्या वर्षभराचा विचार केल्यास नेपाळच्या राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. एका महिन्यांपूर्वी नेपाळमध्ये बालेन शाह यांच्या नेतृत्वात नवीन सरकार स्थापन झालं. मात्र, त्यानंतर अवघ्या एका महिन्यांत गृहमंत्री सुदान गुरुंग यांच्यावर राजीनामा देण्याची वेळ आली. सुदान गुरुंग यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप झाले आहेत. त्यामुळे या आरोपानंतर सुदान गुरुंग यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे.

## ट्रम्प यांनी अमेरिका-इराण युद्धविराम वाढवला



**वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)–** अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविरामाची मुदत संपण्यास काही तास बाकी असतानाच राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धविराम पुढे वाढवला आहे. बुधवारी ट्रम्प यांनी घोषणा केली की, इराणकडून अधिकृत प्रस्ताव सादर होईपर्यंत युद्धविराम कायम ठेवण्यात येईल. या युद्धविरामाचे श्रेय ट्रम्प यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ आणि फील्ड मार्शल आसिम मुनीर यांना दिले आहे.

ट्रम्प म्हणाले की, गंभीर अंतर्गत मतभेदांनी ग्रासलेल्या इराणी सत्तेला स्थायी शांतता करारासाठी एकसंघ प्रस्ताव सादर करण्यासाठी वेळ द्यायचा आहे. अमेरिकेने प्रथमच इराणच्या पुढील भूमिकेसाठी कोणतीही निश्चित वेळमर्यादा ठेवलेली नाही. या धोरणातील बदलाचे श्रेय ट्रम्प यांनी पाकिस्तानी नेतृत्वासोबत झालेल्या चर्चेला दिले.ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर लिहिले, इराण सरकार गंभीरपणे विभागलेले आहे, हे अपेक्षितच होते. पाकिस्तानचे फील्ड मार्शल आसिम मुनीर आणि पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्या विनंतीवरून आम्ही हल्ला थांबवला आहे. इराणचे नेते आणि प्रतिनिधी एकसंघ प्रस्ताव घेऊन समोर येईपर्यंत हा हल्ला स्थगित राहील.

मात्र, ट्रम्प यांनी स्पष्ट केले की होर्मूज सामुद्रधुनीत इराणच्या किनाऱ्यावरील बंदरांची नाकेबंदी कायम राहील, तर अमेरिकन सैन्य इतर सर्व बाबतीत सज्ज आणि सक्षम राहील. त्यांनी सांगितले की, प्रस्ताव सादर होईपर्यंत आणि चर्चा कोणत्यातरी निष्कर्षापर्यंत पोहोचेपर्यंत युद्धविराम वाढवला जाईल.

दरम्यान, पाकिस्ताननेही युद्धविराम वाढवण्याच्या विनंतीला मान्यता दिल्याबद्दल आणि आपल्या राजनैतिक प्रयत्नांना पाठिंबा दिल्याबद्दल ट्रम्प यांचे आभार मानले. आसिम मुनीर यांनी 'एक्स'वर लिहिले, मी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे आभार मानतो की त्यांनी सुरू असलेल्या राजनैतिक प्रयत्नांना पुढे जाण्याची संधी देण्यासाठी युद्धविराम वाढवण्याच्या आमच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद दिला. पाकिस्तान संघर्षाच्या चर्चात्मक तोडग्यासाठी आपले प्रामाणिक प्रयत्न सुरू ठेवेल.ते पुढे म्हणाले, मला पूर्ण विश्वास आहे की दोन्ही बाजू युद्धविरामाचे पालन करतील आणि इस्लामाबाद येथे होणाऱ्या चर्चेच्या दुसऱ्या फेरीत संघर्ष कायमस्वरूपी संपवण्यासाठी व्यापक शांतता करारापर्यंत पोहोचतील.

जागतिक शांतिदूत म्हणून स्वतःची नवी प्रतिमा निर्माण करण्याच्या प्रयत्नात पाकिस्तान अमेरिका आणि इराणमधील मतभेद कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. यामागे स्वतःची राजनैतिक प्रतिमा उंचावणे आणि परदेशी व्यापार व गुंतवणूक आकर्षित करणे हा उद्देश आहे. अलिकडच्या काळात पाकिस्तानची आर्थिक कमजोरी स्पष्टपणे समोर आली आहे. देशात खर्च वाचवण्यासाठी दररोज वीज कपातीचा सामना करावा लागत आहे, तसेच सौदी अरेबियाकडून ३ अब्ज डॉलर्सचे आपत्कालीन कर्ज घ्यावे लागले आहे. जर इस्लामाबादने खरोखरच इराणवरील पुढील हल्ले रोखण्यासाठी ट्रम्प यांच्यावर दबाव टाकला असेल, तर त्यामुळे पाकिस्तानच्या राजनैतिक प्रतिमेला मोठा फायदा होईल आणि जागतिक स्तरावर त्याची विश्वासार्हता अधिक मजबूत होईल.

## पंतप्रधान मोदींबाबत 'दहशतवादी' शब्द वापरणे खरगेंना पडले महागात! निवडणूक आयोगाने घेतली गंभीर दखल

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याची केंद्रीय निवडणूक आयोगाने बुधवारी गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणात निवडणूक आयोगाने खरगे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यांना २४ तासांच्या आत आपली भूमिका स्पष्ट करण्यास सांगण्यात आले आहे.

देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांच्यासह तीन केंद्रीय मंत्र्यांचा समावेश असलेल्या भाजपाच्या एका शिष्टमंडळाने निवडणूक आयोगाकडे धाव घेत काँग्रेस अध्यक्षांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. यानंतर निवडणूक आयोगाने खरगे यांना नोटीस पाठवली आहे.



काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख 'दहशतवादी' असा केल्याने मोठा राजकीय वाद निर्माण झाला. अण्णा द्रमुक पक्षाने मोदींबरोबर हातमिळवणी केल्याबद्दल टीका करताना खरगे यांनी हे विधान केले होते. मात्र, या विधानावर वाद वाढल्यानंतर खरगे यांनी आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिले आहे.

# मराठी बोला अन्यथा रिक्षा, टॅक्सी चालवणं सोडा; परिवहन खात्याचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील रिक्षा, टॅक्सी तसेच ओला, ऊबर ई-बाईक टॅक्सी सारख्या इतर व्यावसायिक अमराठी वाहनचालकांनी प्रवाशांशी मराठीतून संवाद साधणे अनिवार्य करण्याच्या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने ठोस पावले उचलली आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ, साहित्यिक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत विशेष बैठक आयोजित केली आहे.

शासनाने २०१९ मध्ये घेतलेल्या निर्णयानंतरही अनेक ठिकाणी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. विशेषतः परप्रांतीय वाहनचालकांकडून प्रवाशांशी मराठीत संवाद साधला जात नसल्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. याच पार्श्वभूमीवर हा विषय गांभीर्याने घेत राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे.

परिवहन विभागाच्या वतीने 'महाराष्ट्र दिना'चे औचित्य साधत या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. मराठी भाषेला नुकताच 'अभिजात भाषा' दर्जा मिळाल्याने या उपक्रमाला अधिक महत्त्व प्राप्त झाले असून, हा निर्णय केवळ प्रशासकीय न राहता अमराठी वाहनचालकांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता निर्माण करणारा ठरावा, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. अमराठी वाहनचालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रम तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. मुंबई मराठी साहित्य संघाच्या अध्यक्षा उज्ज्वला मेहेंदळे तसेच ज्येष्ठ साहित्यिक प्रदीप ढवण, महेश केळुसकर, संतोष राणे, अशोक बागवे, बाळ कांदळकर, सुनील तांबे, शिवाजी गावडे, सतीश सोळांकुरकर, अरुण म्हात्रे, एकनाथ आव्हाड, प्रसाद कुलकर्णी, प्राचार्य अशोक चिटणीस, ज्येष्ठ साहित्यिका अनुपमा उजगरे, दीपा ठाणेकर आणि मनीषा राजपूत आदी मार्गदर्शन करणार आहेत.

## दारू पिण्यास विरोध केल्यामुळे पत्नीची हत्या; आरोपी पतीला १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** पत्नीने दारू पिण्यास विरोध केला या कारणावरून संतापलेल्या पतीने पत्नीची निर्घृण हत्या केल्याची घटना बारसगाव (ता. अर्धापूर) येथे घडली होती. याप्रकरणी नांदेडच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने निकाल दिला असून आरोपी पतीला १० वर्षांच्या सश्रम कारावासाची आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

फिर्यादी मारोती काशीराम गीरे (रा. दांडेगांव, सध्या मुक्काम बारसगाव) यांची मुलगी वेदिका हिचा विवाह आरोपी केदारनाथ तुकाराम बुलबुले याच्याशी झाला होता. दोघेही बारसगांव येथील आश्विन पवार यांच्या शेतात सालगडी म्हणून काम करत असत. केदारनाथला दारूचे व्यसन होते, ज्याला वेदिका नेहमी विरोध करायची. याच कारणावरून त्यांच्यात वारंवार वाद होत असत. दि. २२ जून २०२१ रोजी रात्री, आरोपी केदारनाथने वेदिकाला जबरदस्तीने घरी नेले. त्यानंतर २३ जूनच्या पहाटे त्याने वेदिकाच्या माहेरी फोन करून 'तिला काहीतरी झाले आहे' असे कळवले. जेव्हा नातेवाईक घटनास्थळी पोहोचले, तेव्हा वेदिका रक्ताच्या थारोळ्यात मृत अवस्थेत आढळली. याप्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला होता. सहायक पोलीस निरीक्षक आर. टी. नांदगावकर यांनी या प्रकरणाचा तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. खटल्यादरम्यान फिर्यादी, साक्षीदार आणि वैद्यकीय पुरावे तपासण्यात आले. पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी धरले. याप्रकरणी आरोपी केदारनाथ बुलबुले याला १० वर्षांचा कारावास आणि १० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

# महिला विधेयकप्रकरणी काँग्रेसच्या निषेधार्थ आज नांदेडमध्ये भाजप युवा मोर्चाचे 'जनआक्रोश आंदोलन'

### आ.श्रीजया चव्हाण व महानगराध्यक्ष राजूरकर यांची उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** 'नारीशक्ती वंदन अधिनियम' कायद्याला विरोध करणाऱ्या काँग्रेस आणि विरोधी पक्षांच्या धोरणांचा निषेध करण्यासाठी गुरूवार, दि. २३ एप्रिल रोजी नांदेडमध्ये भारतीय जनता पार्टी महानगर युवा मोर्चाच्यावतीने भव्य 'जनआक्रोश आंदोलन' आयोजित करण्यात आले आहे.

शहरातील आयटीआय चौक परिसरातील महात्मा ज्योतिबा फुले पुतळा येथे सकाळी १०:३० वाजता हे आंदोलन होणार आहे. या आंदोलनात आ.श्रीजया चव्हाण व महानगराध्यक्ष माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत. या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष शशिकांत पाटील क्षीरसागर यांनी केले आहे.

केंद्र सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणलेल्या ऐतिहासिक 'नारीशक्ती वंदन अधिनियम' कायद्याच्या विरोधात मतदान करणाऱ्या पक्षांचा पर्दाफाश करणे, हा या आंदोलनाचा मुख्य उद्देश आहे.

भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष शशिकांत क्षीरसागर यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी महिला आरक्षणाला विरोध करून आपली महिला विरोधी मानसिकता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.

या आंदोलनासाठी भोकर विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्रीजया चव्हाण व भाजप महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे. या जनआक्रोश आंदोलनात महिलांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपला निषेध नोंदवावा, असे आवाहन भाजप युवा मोर्चातर्फे त्यांनी केले आहे.

## साताऱ्यात आयटी पार्कसह पर्यावरण, उच्च शिक्षण, रोजगार निर्मितीसाठी राज्य मंत्रिमंडळात निर्णय


**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी महत्त्वपूर्ण निर्णयांचा धडाका लावण्यात आला आहे. यामध्ये पर्यावरण रक्षण, उच्च शिक्षण, रोजगार निर्मिती आणि महसूल विभाग अशा चार महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाने मंजुरीची मोहोर उमटवली आहे.

राज्यातील वाढता कचरा आणि ऊर्जेची गरज लक्षात घेऊन 'महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) धोरण २०२६' ला मान्यता देण्यात आली आहे. या वर्षासाठी ५०० कोटींची तरतूद करण्यात आली असून, प्रत्येक जिल्ह्यात समन्वय समिती नेमली जाईल. हे प्रकल्प पीपीपी आणि हायब्रीड अन्युईटी तत्त्वावर राबवले जाणार असून, यामुळे हरित गृह वायूंचे उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल.

सातारा जिल्ह्यातील नागेवाडी येथे आयटी पार्क उभारण्याचा मोठा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. यासाठी एमआयडीसीला ४२.५५ हेक्टर जमीन देण्यास मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे सातारा आणि पश्चिम महाराष्ट्रातील हजारो तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

राज्यातील ७ आदर्श महाविद्यालयातील शिक्षकांना आता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) निर्देशानुसार मूळ वेतन मिळणार आहे. तसेच, या शिक्षकांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या आगामी पद भरतीमध्ये अतिरिक्त गुणांचा लाभ मिळणार आहे, ज्यामुळे त्यांचा कायमस्वरूपी नोकरीचा मार्ग सुकर होईल.

कमाल जमीन धारणा मर्यादेनुसार भोगवटादार वर्ग-२ मधील जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्यासाठी लागणाऱ्या अधिमूल्याची पुनर्रचना करण्यात आली आहे. या संदर्भातील नवीन अधिसूचना काढण्यास मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दिला आहे.




## राज्यातील ७ साखर कारखान्यांना एनसीडीसीने नाकारले कर्ज

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील सात साखर कारखान्यांना राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ अर्थात एनसीडीसीकडून कर्ज नाकारण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. राज्य सरकारने एकूण १४ कारखान्यांच्या कर्जाचे प्रस्ताव एनसीडीसीला पाठवले होते. यापैकी फक्त ७ कारखान्यांच्या कर्जाचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत.

नकार दिलेल्या कारखान्यात पुणे जिल्ह्यातील तीन कारखाने असून भाजपच्या संग्राम थोपटे यांच्या कारखान्याला ४६७ कोटींचे कर्ज नाकारण्यात आले आहे. दिवंगत अजित पवारांच्या कारखान्याचाही ३६१ कोटींचा प्रस्ताव नाकारण्यात आला आहे. राजकीय वर्तुळात या सगळ्याचे वेगवेगळे अर्थ काढले जात असून त्याविषयी चर्चा सुरु झाली आहे.

ज्यांचं पक्षांतर वाया गेलंय त्यामध्ये माजी आमदार अशोक पवार यांचा समावेश आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीत असलेल्या शिरूरचे माजी आमदार अशोक पवार यांनी अजित पवार यांच्याशी जुळवून घेतले होते. काही महिन्यांपूर्वी झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत अशोक पवार यांच्या पत्नी घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवून निवडून आल्या होत्या. पुणे जिल्ह्यातील तीन कारखान्याला एनसीडीसीने कर्ज नाकारले आहे. त्यामध्ये इंदापूर तालुक्यातील भवानी नगर येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या समावेश आहे.

## नांदेड जिल्ह्यात २७ एप्रिलपासून कृषी साहित्य विक्रेत्यांचा बेमुदत बंदचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील कृषी साहित्य विक्रेत्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्या आणि अडचणींविषयी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २७ एप्रिलपासून बेमुदत जिल्हा बंदचा इशारा दिला आहे. देशभरात होणाऱ्या भारत बंदमध्ये सहभागी होत नांदेड जिल्ह्यातील सर्व कृषी साहित्य विक्रेतेही या आंदोलनात उतरतील, असे निवेदन देण्यात आले आहे.

माफदा (एमएएफडीए)चे महासचिव विपीन कासलीवाल आणि जिल्हाध्यक्ष सदाशिव पुंड यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कृषी अधीक्षक दत्तकुमार कळसाईत यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी खरीप हंगाम २०२६ संदर्भात विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच कृषी साहित्य विक्रेत्यांच्या अनेक प्रलंबित समस्यांवर शासनाने तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जोपर्यंत विक्रेत्यांच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत हा बंद बेमुदत चालू राहील. या काळात जिल्ह्यातील सर्व खत, बियाणे आणि कीटकनाशक विक्रेते आपली दुकाने बंद ठेवतील.

दरम्यान, बैठकीत कृषी अधीक्षक दत्तकुमार कळसाईत यांनी कंपन्यांना कडक इशारा दिला. जर कोणत्याही कंपनीकडून रासायनिक खतांची 'लिंकिंग' करून विक्रेते व शेतकऱ्यांना अडचणीत टाकण्याचा प्रयत्न केला गेला, तर संबंधित कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच खत नियंत्रण अधिनियम आणि जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

या बैठकीला नांदेड कृषी साहित्य (खते, बियाणे, कीटकनाशके) डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्रीधरराव नागापूरकर, विविध तालुक्यांतील अध्यक्ष आणि मोठ्या संख्येने कृषी निविष्ठा विक्रेते उपस्थित होते.

## भारताकडे येणारं जहाज होर्मुझच्या सामुद्रधुनीत जप्त

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इराणच्या इस्लामिक रिवोल्यूशनरी गार्ड कॉर्प्स यांनी होर्मुझची सामुद्रधुनी पार करण्याचा प्रयत्न करणारी दोन जहाजं जप्त केली आहेत. ही जहाजं जप्त करुन इराणकडे नेली जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार दोन पैकी एक जहाज भारताकडे येणार होतं. भारताकडे येणारं जहाज दुबईतून निघालं होतं, ज्यावर लिबेरियाचा ध्वज लावलेला होता.

एएफपीच्या रिपोर्टनुसार आयआरजीसीच्या नौदलानं सकाळी होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये नियमांचा भंग करणाऱ्या दोन जहाजांना ताब्यत घेतलं आहे. आयआरजीसीनं दोन जहाजं जप्त केली असून ती इराणकडे नेली जात आहेत. सागरी वाहतुकीच्या क्षेत्रातील वेबसाईटनुसार इराणच्या ताब्यात असलेल्या जहाजांची नावं MSC-FRANCESCA आणि EP-AMINONDAS अशी आहेत. जहाज ट्रॅकिंग डेटानुसार, इराणकडून जप्त करण्यात आलेलं जहाज एपामिनोंडास हे गुजरातच्या मुंद्रा पोर्टकडे निघालं होतं.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# मतदान करणे सक्तीचे नाही, पण...

भारतीय लोकशाहीची खरी ताकद निवडणुकांमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागात दडलेली आहे. मतदान हा केवळ अधिकार नसून एक मूलभूत राष्ट्रीय कर्तव्य आहे, ही जाणीव समाजात अधिक दृढ होणे आजच्या काळाची गरज आहे. अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने मतदान न करणाऱ्या नागरिकांवर दंड लादण्याची मागणी करणारी जनहित याचिका फेटाळून लावली. या निर्णयातून सक्तीपेक्षा जागृतीचा मार्ग अधिक परिणामकारक असल्याचा स्पष्ट संदेश दिला गेला आहे; मात्र याचबरोबर नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने मतदानात सहभागी होण्याची जबाबदारी अधिक अधोरेखित झाली आहे. अजय गोयल यांनी दाखल केलेल्या याचिकेत मतदान न करणाऱ्यांना सरकारी सुविधांपासून वंचित ठेवण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने सक्तीच्या मतदानाच्या व्यवहार्यतेवर आणि घटनात्मकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. देशातील विविध सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता प्रत्येक नागरिकाला मतदानासाठी बाध्य करणे शक्य नाही, हे न्यायालयाने स्पष्ट केले. अगदी न्यायाधीशांनाही त्यांच्या कामाच्या स्वरूपामुळे मतदानासाठी प्रवास करावा लागू शकतो, असे उदाहरण देत न्यायालयाने या अंमलबजावणीतील अडचणी अधोरेखित केल्या. न्यायालयाचा हा दृष्टिकोन वास्तववादी असला, तरी त्यातून एक महत्त्वाचा प्रश्न पुढे येतो की, जर मतदान सक्तीचे नसेल, तर लोकशाही मजबूत कशी होणार? याचे उत्तर एकच आहे की जागरूक, जबाबदार आणि कर्तव्यदक्ष नागरिक. लोकशाही ही केवळ शासनपद्धती नसून ती एक सतत चालणारी प्रक्रिया आहे, ज्यामध्ये नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक असतो. मतदानाच्या माध्यमातूनच नागरिक आपला आवाज शासनापर्यंत पोहोचवतात आणि सत्ताधाऱ्यांना जबाबदार ठरवतात. भारतात अनेकदा निवडणुकांमध्ये मतदानाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी राहते. शहरी भागात विशेषतः 'माझ्या एका मताने काय फरक पडणार?' अशी उदासीनता दिसून येते. हीच मानसिकता लोकशाहीसाठी सर्वात मोठा धोका ठरू शकते. कारण प्रत्येक मत हे केवळ एक आकडा नसून लोकशाहीच्या पायाभरणीतील एक महत्त्वाचा दगड आहे. जेव्हा मोठ्या प्रमाणावर नागरिक मतदानापासून दूर राहतात, तेव्हा निवडून येणारे प्रतिनिधी संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करतात का, हा प्रश्न निर्माण होतो. न्यायालयानेही आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, मतदानासाठी सक्ती करण्याऐवजी जनजागृती करणे अधिक महत्त्वाचे आहे. एखादा गरीब मजूर आपल्या उदरनिर्वाहासाठी रोजंदारीवर काम करत असेल, तर त्याच्यासाठी मतदान करणे हा आर्थिक प्रश्न ठरू शकतो. त्यामुळे अशा परिस्थितीत दंडात्मक कारवाई करण्याऐवजी त्याला मतदानासाठी प्रोत्साहित करणे आणि सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यामध्ये सुट्टीची व्यवस्था, मतदान केंद्रांची सुलभता, आणि जागरूकता मोहिमा यांचा मोठा वाटा असू शकतो. मतदानाचे महत्त्व केवळ सरकार निवडण्यापुरते मर्यादित नाही. ते नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण, धोरणनिर्मितीवर प्रभाव आणि सामाजिक न्यायाची हमी यासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे. जेव्हा नागरिक मतदान करत नाहीत, तेव्हा ते अप्रत्यक्षपणे आपल्या अधिकारांपासून आणि कर्तव्यापासून देखील दूर जातात. लोकशाहीत निष्क्रियता ही सत्तेच्या केंद्रीकरणाला खतपाणी घालते, तर सक्रिय सहभाग सत्तेवर नियंत्रण ठेवतो. आजच्या डिजिटल युगात माहितीचा अभाव हा मतदान न करण्याचे कारण राहिलेले नाही. उलट, माहितीचा अतिरेक आणि दिशाभूल करणाऱ्या प्रचारामुळे अनेकदा मतदार गोंधळात पडतात. अशा परिस्थितीत जागरूक मतदार बनणे आणि योग्य निर्णय घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मतदान हा केवळ हक्क नाही, तर देशाच्या भवितव्याशी निगडित असलेले कर्तव्य आहे, ही जाणीव प्रत्येक नागरिकामध्ये रुजवणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने सक्तीच्या मतदानाला नकार दिला असला, तरी त्यातून नागरिकांच्या जबाबदारीत कोणतीही सूट मिळत नाही. उलट, ही जबाबदारी अधिक वाढते. लोकशाही मजबूत ठेवायची असेल, तर प्रत्येकाने मतदानाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवणे अपरिहार्य आहे. शासनानेही मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी सकारात्मक उपाययोजना राबवाव्यात, तर समाजानेही मतदानाला एक सण म्हणून नव्हे, तर कर्तव्य म्हणून स्वीकारावे. लोकशाही केवळ संविधानात लिहिलेल्या तत्त्वांवर टिकत नाही, तर ती नागरिकांच्या कृतीतून जिवंत राहते. मतदान हा त्या कृतीचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. त्यामुळे 'मतदान करा' हा संदेश केवळ घोषवाक्य न राहता जीवनमूल्य बनणे आवश्यक आहे.

# डिजिटल युगातही पुस्तकांचे महत्त्व अबाधितच...



आजच्या इंटरनेट गुगल गुरूच्या डिजिटल युगातही ग्रंथवाचनाचे महत्त्व अबाधितच आहे. पुस्तकाचे स्वरूप, वाचनाच्या पद्धती बदललेल्या असल्या तरीही जगभर प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची संख्या आणि वाचक वर्ग उत्तरोत्तर वाढत आहे. जगप्रसिद्ध ब्रिटिश नाटककार विल्यम शेक्सपिअरच्या बहुश्रुत, अतुलनीय, मौलिक योगदानाच्या गौरवार्थ दरवर्षी दिनांक २३ एप्रिल हा दिवस 'जागतिक ग्रंथ/पुस्तक दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. हाच दिवस युनोने नुकताच 'कॉपीराईट दिवस' म्हणूनही घोषित केला आहे. त्यामुळे ग्रंथ वाचन, वाचकांच्या आवडीनिवडी, प्रकाशन व वितरण व्यवहारांशी निगडित बाबीची चर्चा होणे आज अपेक्षित ठरते.

'वाचाल तर वाचाल', 'ग्रंथ हेच गुरू' 'पुस्तकं माणसाचे मस्तक घडवतात' अशी अनेक महत्त्वपूर्ण विधाने मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व अधोरेखित करतात. सध्याच्या व्हॉटस् अप, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्वीटर इ.समाज माध्यमांनी सर्वच वयोगटातील लोकांना भुरळ घातली आहे.

जगभरातील अनेक महापुरुषांनी केवळ पुस्तकांच्या सहवासामुळे, वाचनामुळे त्यांच्या जीवनात कसे आमुलाग्र बदल झाले, हे विविध प्रसंगांतून सांगितले आहे. अशा वाचनप्रेमी महापुरुषांमध्ये थोर अमेरिकन विचारवंत बेंजामिन फ्रँकलिन, माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन, फ्रेंच तत्त्ववेते व्होल्टेअर, क्रांतिबा जोतीराव फुले, महात्मा गांधी, गुरूदेव रविंद्रनाथ टागोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींचा उल्लेख करता येईल. डॉ. आंबेडकर हे तर 'जगावेगळे ग्रंथप्रेमी' होते. त्यांच्या वाचनाची, अभ्यासाची व्याप्ती प्रचंड मोठी होती. आपल्या दांडग्या व्यासंगाच्या आणि वाचनाच्या बळावर त्यांनी विविध क्षेत्रात मूलगामी कार्य केले. त्यांच्या वैयक्तिक लायब्ररीत पन्नास हजारांपेक्षा अधिक पुस्तके होती. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करून त्यांनी आपल्या विचारांना वैज्ञानिक अधिष्ठान दिले. त्यांच्या आगळ्या-वेगळ्या ग्रंथप्रेमाचे एक उदाहरण म्हणजे त्यांनी पुस्तकांसाठी स्वतंत्र 'राजगृह' हे घर बांधले. त्यांनी ग्रंथांच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवून आणत आपल्या अनुयायांना ग्रंथांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या ग्रंथप्रेमाचा वारसा आणि स्मरण म्हणून दरवर्षी चैत्यभूमीवर (दादर) आणि नागपूरच्या दीक्षाभूमीवर हजारो ग्रंथांची विक्री होते.

वाचन संस्कृतीचे महत्त्व सांगताना महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक आचार्य अत्रे वाचनाचा संबंध प्रगल्भता, सुसंस्कृतपणाशी जोडतात. मराठी माणसाची व्याख्या करताना ते समर्पकरित्या म्हणतात, ज्याला तुकोबाचा एक तरी अभंग तोंडपाठ आहे, तोच खरा मराठी माणूस. याचाच अर्थ वाचनातून माणूस सुसंस्कारित, सुसंवादी होतो, त्यास जगण्याची योग्य दिशा मिळते. चांगला वाचकच आदर्श वक्ता होऊ शकतो. वाचनाने शब्दभांडार वाढते आणि संभाषण कौशल्य विकसित होते. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगातही ग्रंथांचे, वाचनाचे महत्त्व तीळमात्र कमी झालेले नाही, किंबहुना ते होऊ शकत नाही. वाचनाचे, पुस्तकाचे माध्यम बदलू शकते. छापील पुस्तकांची जागा काहीअंशी ई-बुक्स घेत आहेत; परंतु ग्रंथव्यवहार, वाचन संस्कृती दिवसेंदिवस वाढत आहे. कारण आज समाजात दीपस्तंभ म्हणावी अशी माणसे 'विरळात विरळ', हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी झालेली आहेत. अशावेळी 'ग्रंथ हेच खरे दीपस्तंभ' ठरू शकतात. ग्रंथामधील मुलगामी विचारच माणसांना मार्गदर्शक ठरू शकतात. पुस्तकांमुळे माणसाचे मस्तक सशक्त बनते, त्याचा आत्मविश्वास वाढतो. रे ब्रेडवेरी नावाचा अमेरिकन विचारवंत वाचनसंस्कृतीचे महत्त्व सांगताना म्हणतो, एखादी संस्कृती लयास नेण्यासाठी पुस्तके जाळण्याची गरज नाही, तर लोकांना वाचनापासून परावृत्त करणे पुरेसे आहे. याचाच अर्थ, वाचन हेच मानवी संस्कृतीच्या उत्कर्षाचे माध्यम असते. वाचनाद्वारेच संस्कृतीचे पुढच्या पिढीस हस्तांतरण करता येते.

इंटरनेट, टी. व्ही., मोबाईल इत्यादी चैनीच्या सुखसुविधांमुळे मानवी जीवनातून वाचनसंस्कृती नामशेष होण्याचा धोका संभवतो. त्यामुळे शाळा, महाविद्यालयांनी, पालकांनी एका विशिष्ट वयापर्यंत विद्यार्थ्यांना वाचन बंधनकारक करणे आवश्यक आहे. पालकांनी स्वतः पुस्तक वाचनाची सवय लावून घेतली तर मुलांना आपोआपच वाचनाचे आकर्षण होईल. कुटुंबात वाचनसंस्कृती जोपासली तर कुटुंबातील सर्वांना वाचनाची गोडी लागण्यास हातभार लागेल. महान लेखक विचारवंताची पुस्तके संग्रही ठेवावीत. त्यामुळे लहान मुलांना वाचनाची सवय लावण्यास मदत होईल. महापुरुषांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग त्यांना सांगावेत. त्यातून त्यांना वाचनाची गोडी लागेल. अशाप्रकारे वाचनाची किमया अगाध आहे. आजच्या जागतिक पुस्तक दिनी सर्व वाचकांना, ग्रंथप्रेमींना नवनवीन पुस्तकाच्या वाचनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

**–प्रा. डॉ. ज्ञानेश्वर डिगोळे**

पदव्युत्तर इंग्रजी विभाग,
पीपल्स कॉलेज, नांदेड
मो. ९९६०१६१३७५

# देशातील वंध्यत्वाच्या समस्या, प्रतिबंध, निदान आणि उपाय



मातृत्व ही जगातील सर्वात मोठी निर्मिती आहे असे मानले जाते. आई होऊनच स्त्री परिपूर्ण होते. पण आधुनिकतेच्या या युगात सामाजिक रूढीही बदलत आहेत. प्राचीन काळी स्त्रीचे सर्वात मोठे उद्दिष्ट आई बनणे हे होते. पण, आज त्याची व्याख्या बदलली आहे. आता महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून चालायला लागल्या आहेत. उच्च शिक्षण, नोकरी, व्यवसाय यामुळे वय वाढत आहे, त्याचवेळी बदलत्या वातावरणाचा महिलांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. याचाच परिणाम म्हणजे अपत्यहीनतेच्या आकडेवारीत वाढ होत आहे. आजच्या युगात जीवनशैली आणि दिनचर्या पूर्णपणे बदलली आहे, ज्याचा परिणाम आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावरही झाला आहे. तसेच उशीर झालेला विवाह, कुटुंब नियोजन या कारणांमुळेही महिलांमध्ये वंध्यत्व येत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या ताज्या अहवालात असे समोर आले आहे की, जगातील प्रत्येक सहा व्यक्तींपैकी एकाला इनफर्टिलिटी म्हणजेच 'वंध्यत्व'चा धोका आहे.

जगातील सुमारे १७.५ टक्के लोक वंध्यत्वाला बळी पडतात. श्रीमंत आणि गरीब अशा दोन्ही देशांमध्ये निर्माण होत असलेल्या या धोक्याबाबत जागतिक आरोग्य संघटनेनेही आपली ताजी आकडेवारी जाहीर केली आहे. यानुसार श्रीमंत देशांतील १७.८ टक्के लोक, तर गरीब देशांतील १६.५ टक्के लोक आयुष्यभर अपत्यहीनतेचे बळी राहतात. जागतिक आरोग्य संघटनेने हा अभ्यास १९९० ते २०२१ दरम्यान केला असून त्यात १३३ अभ्यासांचा समावेश आहे. वैद्यकीय अभ्यासानुसार, विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशांमध्ये वंध्यत्वाची पातळी वेगाने वाढत आहे. विकसनशील देशांमध्ये वंध्यत्वाच्या वाढत्या घटनांमागे अपुरी आरोग्य सेवा, असुरक्षित गर्भपात किंवा प्रजनन अवयवांमध्ये वाढणारे संक्रमण ही प्रमुख कारणे आहेत. 'इंडियन सोसायटी ऑफ असिस्टेड रिप्रॉडक्शन'च्या अहवालदेखील म्हणतो की भारतातील सुमारे दहा ते चौदा टक्के जोडप्यांना वंध्यत्वाचा त्रास होतो. शहरी भागात केसेस जास्त आहेत. येथे सहापैकी एक जोडपे अपत्यहीनतेने त्रस्त आहे.

स्त्रियांच्या दृष्टीकोनातून, वंध्यत्व ही एक गंभीर वैद्यकीय समस्या आहे. अशा परिस्थितीत महिलांना गर्भधारणेसाठी अडचणींचा सामना करावा लागतो.'ओव्हुलेशन डिसऑर्डर', 'फॅलोपियन ट्यूब' बंद पडणे किंवा खराब होणे, 'एंडोमेट्रिओसिस', गर्भाशय आणि त्याच्या तोंडाशी संबंधित समस्या, इत्यादी कारणे आहेत. उशीरा झालेला विवाह, ताणतणाव आणि चुकीचा आहार हेही अपत्यहीनतेला कारणीभूत आहेत. स्त्रियांमध्ये वंध्यत्व हार्मोनल असंतुलन, आजारपण, अल्कोहोल आणि ड्रग्स वापरणे आणि वयानुसार होणारी सामान्य नैसर्गिक प्रक्रिया यामुळे देखील वंध्यत्व येऊ शकते. कधीकधी पुरुषाच्या कमकुवत शुक्राणूंमुळे, गर्भधारणा देखील शक्य होत नाही. पण हे असाध्य नाही. वेळेवर उपचार केल्यास वंध्यत्व बरे होऊ शकते. वाढत्या तंत्रज्ञानाने निपुत्रिक दाम्पत्याला काही प्रमाणात दिलासा देण्याचे काम केले आहे. त्यामुळेच मुलं होण्याची स्वप्ने विकण्याचा व्यवसाय जोरात सुरू आहे. आकडेवारीनुसार, हा व्यवसाय सुमारे चार अब्ज अमेरिकन डॉलर्सचा आहे.

तसे स्त्रीच्या मासिक पाळीचा कालावधी २८ दिवस असतो. कधीकधी हे चक्र २१ ते ३५ दिवसांपर्यंत असते, जे सामान्य मानले जाते. पण, जेव्हा ते अनियमित असते तेव्हा त्याचा महिलांच्या आरोग्यावर परिणाम होतो. हे हार्मोनल असंतुलनामुळे होते.यामुळे महिलांमध्ये वंध्यत्व येऊ शकते. वाढते वय हेही यासाठी प्रमुख कारण मानले जाते. अशा परिस्थितीत गर्भधारणा करणे अधिक आव्हानात्मक बनले आहे. वयाच्या तीस वर्षापर्यंत अंड्यांचा दर्जा चांगला असतो, त्यानंतर त्यांचे प्रमाण कमी होऊ लागते आणि वयाची चाळीशी जवळ येताच ते आणखी कमी होते.यामुळेच आजकाल गर्भ राहणे कठीण झाले आहे.

आपल्या भावी पिढ्यांना ही समस्या टाळायची असेल, तर 'एंडोक्राइन डिस्रप्टिंग' पदार्थांमधील भेसळ कमी करावी लागेल, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. हे पदार्थ अंडाशयांवर परिणाम करतात. कीटकनाशकांचा अंदाधुंद वापर, प्लास्टिक जाळणे, औद्योगिक कारखान्यांतील कचरा यामध्ये हे आढळून येतात. पण वाढत्या बाजारवादाच्या जमान्यात अशा अनेक हानिकारक गोष्टी आहेत, ज्यापासून दूर राहणे जवळजवळ अशक्य आहे. ही समस्या टाळायची असेल तर जीवनशैली संतुलित ठेवली पाहिजे. योग्य आहार आणि नियमित व्यायामाने या समस्येवर मात करता येते. वंध्यत्वाचा स्त्रियांच्या जीवनावर विपरीत परिणाम होतो. आपल्या सामाजिक जडणघडणीत महिलांनाच यासाठी जबाबदार धरले जाते. याचे नकारात्मक सामाजिक परिणाम होतात, ज्यामुळे अनेकदा हिंसा, घटस्फोट, नैराश्य आणि चिंता याला सामोरे जावे लागते.तर वंध्यत्वासाठी केवळ स्त्रीच जबाबदार असत नाही. मात्र असे असूनही पुरुषांवर प्रश्न उपस्थित केला जात नाही.

आपल्या देशातही पुरुष अनेकदा चाचणी करून घेण्यास नकार देतात कारण पुरुष वंध्यत्वाचा संबंध पुरुषत्व आणि सन्मानाशी जोडतात. यामुळेच पुरुषांना चाचणी करून घेण्यास अस्वस्थता वाटते. परंतु पुरुष वंध्यत्वाच्या चाचणीमध्ये आरोग्य तपासणी, एक साधी शारीरिक तपासणी आणि त्यानंतर शुक्राणूंचे विश्लेषण यांचा समावेश होतो. अपत्यहीनतेच्या वाढत्या समस्येचे मुख्य कारण म्हणजे सध्याच्या युगात झपाट्याने वाढणारे प्रदूषण, जे कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आपल्या शरीरात विष पेरण्याचे काम करत आहे.आधुनिकतेच्या या युगात आपली जीवनशैलीही झपाट्याने बदलत आहे. आपलं राहणीमान, खाणं सगळंच बदललं आहे. बदलत्या दिनचर्येसोबतच वातावरणातील बदलाचाही त्यावर परिणाम होत आहे.

पॅसिफिक महासागर प्रदेशात २०.२ टक्के वंध्यत्वाचा सर्वाधिक दर आहे. यामध्ये चीन, जपान, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या देशांचा समावेश आहे. तर ब्रिटनसह युरोपीय देशांमध्ये हा दर १६.५ टक्के आहे, म्हणजेच प्रत्येक सहावा व्यक्ती वंध्यत्वाच्या समस्येने त्रस्त आहे.तर अमेरिकेत हा आकडा वीस टक्के आहे, जो खूप जास्त आहे. भारतातही हा आकडा २० टक्क्यांच्या जवळपास आहे. दुसऱ्या एका अहवालानुसार, जम्मू-काश्मीर, दिल्ली, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि झारखंडमध्ये अपत्यहीनतेची समस्या वेगाने वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेने १५ ते ४९ वयोगटातील महिलांच्या माहितीच्या आधारे हा निष्कर्ष काढला आहे.

वंध्यत्वाचा आर्थिक अडचणींच्या रूपाने दाम्पत्याच्या जीवनावरही परिणाम होतो. आपल्या देशात वंध्यत्वाची समस्या वाढत असतानाही, त्याच्या प्रतिबंध, निदान आणि उपचारासाठी कोणतेही विशेष उपाय योजले जात नाहीत. 'इन विट्रो फर्टिलायझेशन' (आइवीएफ) सारख्या तंत्रांनाही पुरेसा निधी मिळत नाही. जास्त खर्च, सामाजिक कलंक आणि मर्यादित उपलब्धता यामुळे वंध्यत्वावर उपचार करणे कठीण होते. विशेषतः मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबातील लोकांच्या क्षमतेपासून ते दूर आहे. सरकारने या दिशेने पुढाकार घेतला पाहिजे, जेणेकरून सार्वजनिक निधीतून वंध्यत्वाच्या उपचारांसाठी सुलभता येईल. जागतिक आरोग्य संघटनेनेही आपल्या शिफारशीत म्हटले आहे की, जगभरातील सरकारांनी वंध्यत्व हा सार्वजनिक आरोग्याचा मुद्दा मानून त्यावर खर्च वाढवावा. आइवीएफ सारखी परवडणारी आणि उच्च-गुणवत्तेची प्रजनन केंद्रे गरजूंना उपलब्ध असावीत, जेणेकरून वंध्यत्वाला आळा घालता येईल आणि सुखी कुटुंबाचा पाया रचला जाईल.

**–मच्छिंद्र ऐनापुरे**

जत, जि. सांगली

# मित्र : जीवनाचा मार्गदर्शक!



कोणाच्या जीवनात कोण कधी येणार हे सांगता येत नाही. कुटुंबात, समाजात वावरत असताना एकमेकांना परस्परपूरक आधार मिळणे आवश्यकच.दोन वा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकाच विचाराने प्रेरित होऊन एकजुटीने कार्य करीत असतात. सर्वांचे विचार एकमत घेऊन पुढे गेल्यास निश्चितच बदल होतो. बालपणी आईच्या पदरात असताना भीती नावाची वस्तू राहत नाही. निस्वार्थ भावनेने काळजी घेणारी माता म्हणजे आई. चालायला, बोलायला, संस्कार देण्यासाठी जीवन व्यतीत करणारे वडील सुद्धा महत्वपूर्ण असतात. जन्मदात्यांच्या सानिध्यात असताना आजी-आजोबा, काका-काकू, मावशी-मामा व इतर नात्यांशी मेळ जुळत असतोच. शाळकरी, कॉलेजात शिकत असताना मित्रांच्या मांदियाळीत मौजमजा चालत असते. कधी तर इतके मित्र-मैत्रिणीमध्ये नाते घट्ट होत जाते की, त्यांच्याविना जगणे असह्य होऊन जाते आणि त्यानंतर वयात आल्यानंतर समाजमान्य विवाह केल्यावर आपली काळजी घेण्यासाठी हक्काचा व्यक्ती मिळत असतो. जीवनात विवाह हा संस्कार असून दोन जीव एकमेळ होऊन संसार चालवीत असतात. असं असतांना सुद्धा मित्र हा खरा मार्गदर्शक, दाता असतो. आपल्या जीवनात घडणाऱ्या बाबींचे यथार्थ वर्णन करण्यासाठी गरजेचा असतो.

मैत्री वा प्रेम एखाद्यावर जाणून केले जात नाही. एकमेकांचे विचार समपातळीवर चालत असल्याने एकत्र विचारांची देवाणघेवाण करीत असतात. केवळ बाह्य निरीक्षण करून मैत्रीच्या वा प्रेमाच्या जाळ्यात ओढताना ओढाताण नक्की होतो. आकर्षणामुळे एखादी व्यक्ती आपल्या मनाला हवी-हवीशी वाटत असते. आपल्या समोर असणाऱ्या व्यक्तीच्या मनाचा आवाका न बघता विचारमंथन करणे म्हणजे एकतर्फी असते.एकतर्फी प्रेमातून हिंसा, बलात्कार वा हल्ले होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

लैंगिक शिक्षणाच्या अज्ञानामुळे वा स्त्रीला दुय्यम स्थान दिल्याने बळजबरी केल्या जाते. मनात असलेली शारीरिक वासना स्वस्थ बसू देत नाही. प्रेम म्हणजे त्यागाचा एक उत्कृष्ठ नमुना आहे. समाजात घडत असलेल्या विघातक घटनेला आळा घालायचा असल्यास संविधानातील 'स्त्री-पुरुष समानता' हे मूल्य अंगिकारायला हवेच. तरुणाई सध्या वॉट्सअॅप,फेसबुकच्या युनिव्हर्सिटीमध्ये जास्त व्यस्त असल्याने क्रियाशीलता कमी होत आहे. कामुक भावनेचे व्हीडीओ बघून वासना अधिक निर्माण होते. हिंगणघाट, हाथरस येथील घटना तसेच मणिपूरमधील दोन विवस्त्र महिलेची काढलेली धिंड समाजाला काळिमा फासणारी घटना आहे. आपल्या जीवनात येणारी व्यक्ती त्रास देणारी नको तर याउलट 'तुम क्या मिले...' म्हणजे तुम्ही मिळाल्यावर जीवनात आशावादी चित्र निर्माण झाले पाहिजे असे मनोमन वाटायला हवे.

'तरुणाई' ही देशाला लाभलेली देणगी आहे. आजचे तरुण उद्याची भावी पिढी आहे. तरुणाई व्यसनाच्या आहारी गेली तर राष्ट्राला घातकच आहे. प्रेमात भरकटत आहे. केवळ वासनेच्या आहारी जाऊन जिंदगीची धूळधाण करत आहे. आई-वडिलांच्या स्वप्नाला मूठमाती देत प्रेमामध्ये आंधळे होत आहे. love is a part of life but not a whole life असं असतानासुद्धा प्रेमात पडून आपली जीवनयात्रा संपविण्याच्या घटना घडत आहे.

प्रेमात असतांना गैरसमज पसरविणारे आपलेच असतात. गैरसमज निर्माण होऊन दोघांत तेढ आणखी वाढत जाते. प्रेमात असलेल्या व्यक्ती सोबतीने जीवन जगण्याचा अट्टाहास..त्यानंतर त्यांच्यात येणाऱ्या वितुष्ट, वेदना, विरह असह्य होत असल्याने जीवनाची सांगता करून जोडीने निरोप घेत आहे. या गोष्टी आजच्या तरुणाईला भूषणावह नाही. म्हणून अगोदर शिक्षणाला महत्त्व देण्यात यावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' हा संदेश तरुणाईने घ्यायला हवा. 'लगेगी नोकरी तो मिलेगी छोकरी' हा आशावाद मनी बाळगला पाहिजे.

कॉलेजचे दिवस तसे रंगीनच असतात. एकमेकांच्या आवडीनुसार वागणे, आपल्या आवडत्या व्यक्तीच्या शब्दाला प्रमाण मानणे, फिरायला जाणे, सहलीला जाणे, कॅफेत जाणे इत्यादी अनेक गोष्टीचे आकर्षण असते. आवडीने सहवासात राहून मैत्रीचे रोपटे कधी प्रेमाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपते कळतच नाही. प्रेमात इतके गढून जातात की, दुसरं काहीही दिसत नाही. पुढच्या व्यक्तीचा चेहरा नि आठवणी ह्याच मनात साठवून ठेवून वागत असतात. उठता-बसता त्यांच्याच आठवणी मनात घर करीत असतात.चित्रपटात बघितल्याप्रमाणे वास्तवात आपण तसेच जगण्याच्या आणाभाका घेत असतात. तुम्ही जेव्हापासून माझ्या जीवनात आलात तेव्हापासून जीवन जगण्याचा आनंद गगनात मावेनासा होऊन गेला याची कोमल झुळूक ओठावर स्मित हास्य करवून जाते.प्रेमीयुगलांच्या मुखातून मग तुम क्या मिले जाने जा..प्यार जिंदगी से हो गया.. असे शब्द तरळत राहते.

प्रेमीयुगुल ज्याप्रमाणे तना-मनाने एकत्र आलेले असते त्याचप्रमाणे त्यांच्या वलयाभोवती असलेले नात्यांची वीण घट्ट व्हायला हवी तेव्हाच नात्यातील माणसे देखील तुमच्याकडे बघितल्यावर म्हणायला हवे ना!! की तुम क्या मिले.. सबका दिलं खुले... एखादा व्यक्ती तुमच्या जीवनात आल्यावर तुमच्यात झालेला बदल, जीवनाशी समरस होण्याची संधी हीच खरी जगण्याची नांदी आहे हे मनात यायला हवे. जेव्हा-जेव्हा आठवणींचे काहूर मनात येतात तेव्हा तुम जो मिले..तो मन आनंदात डोले असा खराखुरा भास व्हायला हवा आणि जिंदगी जगण्याची ओढ निर्माण झाली पाहिजे क्योकी तुम जो मिले...

**–दुशांत निमकर**

चंद्रपूर
मो. ९७६५५४८९४९

# भोकरमध्ये आगीचे तांडव; चार फर्निचर दुकाने जळून खाक, अंदाजे पावणे चार कोटींचे नुकसान





**भोकर (प्रतिनिधी)** –येथील उमरी रोड परिसरात काल मध्यरात्री आगीचे भीषण तांडव पाहायला मिळाले. या आगीत एका कष्टकरी कुटुंबाची अनेक वर्षांची मेहनत काही तासांतच राख झाली. राचूटकर परिवारातील चुलत्या-पुतण्यांच्या चार मोठ्या फर्निचर दुकानांना आणि सीएनसी मशीन सेंटरला लागलेल्या या आगीत सुमारे ३ कोटी ७४ लाख ८० हजार ८०० रुपयांचे नुकसान झाले आहे.

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार २२ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्री २ ते २:३० वाजेच्या सुमारास उमरी रोडवरील या दुकानांमधून अचानक आगीच्या ज्वाला निघू लागल्या. वाळलेले लाकूड आणि फर्निचर बनवण्यासाठी लागणारे केमिकल, फोम यांमुळे आगीने अल्पावधीतच रौद्र रूप धारण केले. आगीचे लोट इतके उंच होते की, दुरूनही आकाशात धुराचे लोट दिसत होते. शेजारी राहणाऱ्या नागरिकांनी प्रसंगावधान राखून मालकांना आणि अग्निशमन दलाला कळवल्यामुळे पुढील अनर्थ टळला.

या घटनेचे गांभीर्य ओळखून भोकर नगर परिषदेसह उमरी, हिमायतनगर आणि नजीकच्या ७ ते ८ अग्निशमन दलाच्या गाड्यांना पाचारण करण्यात आले. स्थानिक तरुणांनी आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी जीवाची बाजी लावून आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, आगीची तीव्रता इतकी प्रचंड होती की, लोखंडी शेड देखील पत्यासारखे कोसळले.

या आगीमुळे चुलते आणि पुतण्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी झाली. या आगीत एकनाथ परमेश्वर राचूटकर (साईकृपा होलसेल फर्निचर) यांचे अंदाजे १ कोटी १५ लाख १५ हजार ८०० रुपये तर सचिन साईनाथ राचूटकर (तिरूमला होलसेल फर्निचर) यांचे अंदाजे १ कोटी ५० लाख ७ हजार रुपये, सुरज साईनाथ राचूटकर (तिरूमला सीएनसी कारवीन सेंटर) अंदाजे ९२ लाख ९३ हजार रुपये, दीपक गोपीनाथ राचूटकर (साईकृपा सीएनसी कारविन सेंटर) अंदाजे ५६ लाख ६५ हजार रुपये नुकसान झाले.

दुकानातील अत्याधुनिक सीएनसी मशिन्स, महागडे सागवान, तयार फर्निचर आणि महत्त्वाचे कायदेशीर दस्तऐवज सर्व काही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आहे.

घटनेची माहिती मिळताच तहसीलदार विनोद गुंडमवार, पोलीस निरीक्षक अजित कुंभार, नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवडे यांच्यासह महसूल प्रशासनाने तातडीने भेट दिली. प्रशासनाकडून पंचनामा पूर्ण करण्यात आला असून, हा अहवाल तातडीने शासनाकडे पाठविण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले आहे.

शहरातील एका व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले असून, राचूटकर कुटुंबावर ओढवलेले संकट दूर करण्यासाठी शासनाकडे तातडीने विशेष मदतीसाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी व्यापारी वर्गाने केली असून, या मागणीची दखल घेऊन तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी विशेष लक्ष घालून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहोत, अशी ग्वाही दिली.

# एमजीएममध्ये भारतीय वायुसेनेचा इंडक्शन कार्यक्रम संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)**– एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात भारतीय वायुसेनेच्या वतीने आयपीईव्ही हा कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. विद्यार्थ्यांना भारतीय वायुसेनेतील करिअरच्या संधींबाबत जागरूक निर्माण करणे, तसेच देशसेवेसाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे हा कार्यक्रम घेण्यामागचा मुख्य हेतू होता, असे आयोजकांनी सांगितले.

हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर प्रा. शिवप्रसाद तितरे यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रमाला भारतीय वायुसेनेच्या अनेक अधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली होती. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पथकाचे नेतृत्व विंग कमांडर लोकेन्द्र सिंग कुम्पावत (लॉजिस्टिक्स शाखा) यांनी केले. तसेच स्कॉड्रन लीडर राजन अरोरा, फ्लाइंग ऑफिसर राहुल यादव (सध्या सुखोई SU-३० MKI लढाऊ विमानाचे वैमानिक), आणि फ्लाइट लेफ्टनंट गुरजीत सिंग भुल्लर (फायटर कंट्रोलर) यांची उपस्थिती होती. तसेच वॉरंट ऑफिसर देवेश कुमार, सार्जंट अनिल कुमार निर्मल, सार्जंट दीपक कुमार तसेच इतर सहायक कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम महाविद्यालयातर्फे भारतीय वायुसेनेच्या उपस्थित सर्व अधिकाऱ्यांचे गांधीजींची प्रतिमा, शाल आणि फुले देऊन संचालिका डॉ. गीता लाठकर यांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी प्रास्ताविकपर भाषणात गीता लाठकर म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी वायुसेनेत जाऊन देससेवा करावी. वायुसेनेची निवडप्रक्रिया जरी कठीण असली तरी जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न कधीच वाया जात नाहीत.

या कार्यक्रमात स्कॉड्रन लीडर राजन अरोरा यांनी भारतीय वायुसेनेचा इतिहास, विकास, आणि भूमिका आदींसह विविध प्रकारच्या विमानांविषयी सविस्तर माहिती यावेळी विद्यार्थ्यांना दृकश्राव्य माध्यमातून दिली. यानंतर फ्लाइट लेफ्टनंट गुरजीत सिंग भुल्लर यांनी विद्यार्थ्यांना भारतीय वायुसेनेत प्रवेश कसा मिळवायचा याबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी विविध प्रवेशमार्ग, परीक्षा, करिअर संधी आणि प्रशिक्षण प्रक्रियेची माहिती दिली. त्यानंतर विंग कमांडर लोकेन्द्र सिंग कुम्पावत यांनी संवादात्मक सत्र घेतले. त्यांनी आपल्या अनुभवांच्या आधारे विद्यार्थ्यांना योग्य परीक्षा आणि प्रवेशमार्ग निवडण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यांचे सत्र अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरले.

# 'भूगोलाचा इतिहास'चे आज जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रकाशन!

**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठवाड्यातील प्रयोगशील लेखक तसेच विज्ञान, भूगोलसह विविध विषयांचे अभ्यासक एल. के. कुलकर्णी लिखित 'भूगोलाचा इतिहास' या नव्या पुस्तकाच्या प्रकाशनपूर्व नोंदणीस महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळाला असून, त्याचे अनौपचारिक प्रकाशन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते गुरुवारी होणार आहे.




२३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा होतो. त्यानिमित्त ठिकठिकाणी पुस्तकांशी संबंधित कार्यक्रम पार पाडले जात असताना नांदेडमध्ये एल. के. कुलकर्णी यांच्या पुस्तकाचे वाचकार्पण होणार आहे.

एल. के. कुलकर्णी यांना २०२४ सालांत दैनिक लोकसत्तामध्ये 'भूगोलाचा इतिहास' या सदरामध्ये वर्षभर लेखन करण्याची संधी मिळाली. या विषयाच्या अनुषंगाने त्यांचे ४९ लेख प्रकाशित झाले. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे सर्व लेख खूपच उपयुक्त ठरल्याचे दिसून आले.

वर्षभरातील वेगवेगळ्या लेखांमध्ये आवश्यक त्या बाबी समाविष्ट करून त्यांनी ते उपलब्ध करून दिल्यानंतर नांदेडच्या अभंग प्रकाशन संस्थेने या लेखांना पुस्तकरूप दिले. नांदेडच्याच दासू भगत यांनी नव्या पुस्तकाची लक्षवेधी मांडणी केली आहे.

# आरपीएफ नांदेडची कारवाई : रेल्वे मालमत्ता चोरी प्रकरणातील आरोपी अटक, हरवलेली अल्पवयीन मुलगी आईच्या स्वाधीन

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा बल यांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेसह रेल्वे मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी परभणी आणि छत्रपती संभाजीनगर येथे दोन स्वतंत्र कारवायांमध्ये महत्त्वपूर्ण यश मिळवले आहे.

हरवलेली अल्पवयीन मुलगी आईच्या स्वाधीन करण्यात आली असून, दरम्यान ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत दि. २१ एप्रिल २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक येथील महिलांच्या प्रतीक्षालयात छोटी पुनिया, महिला कॉन्स्टेबल-१४६५ आणि जीआरपी कर्मचारी पंकज दिघोळे, हेड कॉन्स्टेबल यांना सुमारे १६ वर्षांची एक मुलगी एकटी बसलेली आढळली. तिला पुढील चौकशीसाठी जीआरपी पोलीस ठाण्यात नेण्यात आले. चौकशीदरम्यान तिने आपली ओळख सांगितली. त्यानंतर जीआरपी कर्मचाऱ्यांनी तिच्या आईशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. काही वेळातच त्या स्टेशनवर दाखल झाल्या. योग्य पडताळणी आणि आवश्यक औपचारिकता पूर्ण केल्यानंतर सदर अल्पवयीन मुलीला तिच्या आईच्या स्वाधीन करण्यात आले. मुलगी सुरक्षित परत मिळाल्याबद्दल तिच्या आईने रेल्वे प्रशासनाचे आभार मानले.

ऑपरेशन रेल सुरक्षा अंतर्गत दि. २० एप्रिल २०२६ रोजी परभणी रेल्वे स्थानक यार्ड परिसरात रेल्वे मालमत्ता चोरी करणाऱ्यांवर गुप्त नजर ठेवताना अमोल वावळे, पोलीस उपनिरीक्षक, रेल्वे सुरक्षा बल आणि महेंद्रसिंग चव्हाण, हेड कॉन्स्टेबल यांनी एका संशयित व्यक्तीस ताब्यात घेतले. या व्यक्तीचे नाव राधे रा. परभणी असे असून त्याच्याकडे ५२ किलो फिश प्लेट (१ मीटर) आणि ३ पेंड्रोल क्लिप असलेली पॉलिथिनची पिशवी आढळली. या मालाबाबत त्याच्याकडे कोणतेही वैध अधिकृत कागदपत्र किंवा पावती नव्हती. पंचांसमक्ष चौकशी केल्यानंतर त्याने यार्ड परिसरातील ट्रॅकजवळून ही रेल्वे मालमत्ता चोरी केल्याची कबुली दिली. चौकशी करून संबंधित मालमत्ता जप्त केली.

# कुंटूर तांड्यावर डेंग्यूचा धोका; जिल्हा हिवताप अधिकाऱ्यांची तातडीची भेट, आरोग्य यंत्रणा सतर्क



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**– नायगाव तालुक्यातील कुंटूर तांडा येथे डेंग्यूसदृश रुग्ण आढळून आल्याने आरोग्य विभागाने तातडीने हालचाल करीत परिस्थितीचा आढावा घेतला. काही रुग्ण नांदेड येथे उपचार घेत असल्याची माहिती मिळताच दि. २२ एप्रिल रोजी जिल्हा हिवताप व हत्तीरोग अधिकारी डॉ. अमृत चव्हाण यांनी जिल्हास्तरीय पथकासह कुंटूर तांड्याला भेट दिली.

या भेटीदरम्यान डॉ. चव्हाण यांनी डेंग्यू बाधित रुग्णांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली व त्यांच्या आरोग्यस्थितीची माहिती घेतली. तसेच गावात ताप रुग्णांचे सर्वेक्षण (फिव्हर सर्व्हे), अबेटिंग (डासांची पैदास रोखण्यासाठी उपाययोजना) आणि किटकशास्त्रीय सर्वेक्षण यांसारख्या महत्त्वाच्या उपाययोजना राबविण्यात आल्या.

आरोग्य पथकाने गावात स्वच्छतेवर विशेष भर देत नागरिकांना मार्गदर्शन केले. घराभोवती साचलेले पाणी काढून टाकणे, नाल्या स्वच्छ व वाहत्या ठेवणे, तसेच आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळून पाण्याचे साठे रिकामे करण्याचे आवाहन करण्यात आले. डेंग्यूच्या लक्षणांबाबत व प्रतिबंधात्मक उपायांबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली. यासाठी ग्रामस्थांची कॉर्नर बैठक घेऊन आरोग्य शिक्षणही देण्यात आले.

दरम्यान, ग्रामविकास अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून परिसरात तात्काळ स्वच्छता मोहीम राबविणे व नाल्या वाहत्या करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# सेवानिवृत्तीबद्दल निरोप समारंभ

**देगलूर (प्रतिनिधी)**– येथील नगरपरिषद कार्यालयातील गणपत विठ्ठल वाघजी व बलराज इरन्ना अल्लमवार हे नियत वयोमानानुसार दि. ३१ मार्च २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीबद्दल एका कार्यक्रमात निरोप देण्यात आला.

यावेळी मुख्याधिकारी सौ. नीलम कांबळे यांच्या हस्ते गणपत वाघजी व बलराज अल्लमवार यांचा पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय व अक्षय पल्लेवाड इम्तियाज हुसेन गौरव जाधव लालू सोनकांबळे, रतन सूर्यवंशी, दत्तात्रय मारावार,संतोष देशमुख, शंकर रोयलावार, नारायण इंगोले आदी उपस्थित होते.

# दक्षिण मध्य रेल्वेची विशेष गाड्यांच्या धावण्याला मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता तसेच प्रवाशांना अधिक प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने पुढील ट्रेन ऑन डिमांड (ढजऊ) विशेष गाड्यांची एक फेरी वाढविण्याच्या निर्णय घेतला आहे. या विशेष गाड्या विद्यमान थांबे, वेळापत्रक सह चालवल्या जाणार आहेत.

गाडी क्रमांक ०७६०५ तिरुपती अकोला विशेष गाडी शुक्रवारी धावणार असून तिची सेवा २४ एप्रिल २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

गाडी क्रमांक ०७६०६ अकोला तिरुपती विशेष गाडी रविवारी धावणार असून तिची सेवा २६ एप्रिल २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

गाडी क्रमांक ०७०१५ नांदेड तिरुचेंनुर विशेष गाडी शनिवारी धावणार असून तिची सेवा २५ एप्रिल २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

गाडी क्रमांक ०७०१६ तिरुचेंनुर नांदेड विशेष गाडी रविवारी धावणार असून तिची सेवा २६ एप्रिल २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

गाडी क्रमांक ०७१८९ नांदेड धर्मावरम विशेष गाडी शुक्रवारी धावणार असून तिची सेवा ०१ मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

# दिल्ली येथील साहित्य संमेलनात डॉ. ज्योती कदम यांच्या कवितेचा गौरव



**नांदेड (प्रतिनिधी)**– महिला शासकीय अधिकाऱ्यांचे पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ११ व १२ एप्रिल रोजी महाराष्ट्र सदन दिल्ली येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाले. या संमेलनात नांदेड येथील पोलीस अधिकारी डॉ. ज्योती कदम यांनी सादर केलेल्या 'कर्फ्यू दरम्यानचं शहर' या एकमेव कवितेबद्दल संमेलनाच्या स्वागताध्यक्षा तथा ज्येष्ठ सनदी अधिकारी सुप्रिया देवस्थळी, तसेच संमेलनाध्यक्षा, माजी अतिरिक्त मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांनी समारोप सत्रात गौरवोद्गार काढले.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उदय सावंत, मराठी भाषा आणि उद्योगमंत्री महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्राच्या माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत संमेलनाचे उद्घाटन झाले. मान्यवरांचे हस्ते सकाळी ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात झाली. विविध विषयांवरील परिसंवाद आणि कविसंमेलनाचे विविध सत्र हे संमेलनाचे प्रमुख आकर्षण होते. वित, सहकार, महिला व बालकल्याण, पोलीस, वैद्यकीय, कायदा, मंत्रालय, शिक्षण, जलसंपदा, महसूल, परराष्ट्र मंत्रालय, उच्च आयुक्तालय इ. विविध क्षेत्रातील केंद्र आणि विविध राज्य शासनाच्या महिला अधिकारी या संमेलनात उपस्थित होत्या. वेगवेगळ्या उच्च पदावर कार्यरत असणाऱ्या या साहित्यिक महिला शासकीय अधिकाऱ्यांचे हे पहिले संमेलन सर्वच दृष्टीने ऐतिहासिक ठरले. सरहद्द, पुणे, मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र सदन नवी दिल्ली यांनी या संमेलनाचे आयोजन केले होते.

# फुले-आंबेडकर जयंतीनिमित्त २५ एप्रिल रोजी विविध कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)**– लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ लसाकम जिल्हा शाखा नांदेडच्या वतीने शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी दुपारी १.३० वाजता हॉटेल ग्रँड मराठा छत्रपती चौक नांदेड येथे महात्मा जोतीबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब, उद्घाटक म्हणून लसाकमचे महासचिव गुणवंत काळे, स्वागताध्यक्ष चंद्रकांत मेकाले यांची उपस्थिती राहणार आहे.

यावेळी डॉ. भगवानराव वाघमारे यांचे सत्य धर्मावर व्याख्यान होणार आहे. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र व समाज यावर साहित्यिक प्रा. शेख निजाम यांचे व्याख्यान होणार आहे. योजना मार्गदर्शक म्हणून आरटीचे प्रकल्प व्यवस्थापक धोंडीबा नामवाड, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर. एन. पवार, जिल्हा उद्योग केंद्राचे जिल्हा उद्योग अधिकारी शिवाजीराव कासारकर यांची उपस्थिती राहणार आहे.

यावेळी शिवा कांबळे, शिवाजीराव कासारकर, शिवाजी टोम्पे, माधव डोम्पले, डॉ. एच. एस. पाटोडे, प्रणव खानापूरकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे. मनपा उपकार्यकारी अभियंता प्रकाश कांबळे, इंजि. राजासाहेब बोराळे यांची उपस्थिती राहणार आहे.

# भीम जयंतीनिमित्त शांतता कमिटीची बैठक



**मुदखेड (प्रतिनिधी)**– भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या अनुषंगाने मुदखेड शहरासह ग्रामीण भागातील भीम जयंती शांततेत साजरी व्हावी याकरिता नुकतीच पोलीस प्रशासनाच्या वतीने मुदखेड येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात शांतता समितीची बैठक पार पडली. ही बैठक तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

या बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी संजीवन मिरकले, पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण तसेच नगरसेवक संजय आऊलवार. नगरसेवक अविनाश चौदते यांच्यासह विविध नगरातील भीम जयंती मंडळाचे पदाधिकारी, विविध शासकीय कार्यालयातील कर्मचारी या बैठकीला उपस्थित होते. २६ एप्रिल रोजी मुदखेड शहरांमध्ये भीम जयंती मिरवणूक सोहळा त उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात येणार असून, मिरवणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी भीम जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन याप बैठकीत करण्यात आले.

भीम जयंतीची मिरवणूक शहरातील प्रमुख रस्त्यावरून जाताना कुठेही अडथळा निर्माण होणार नाही याविषयी संबंधितांनी दक्षता घ्यावी, असेही या बैठकीत सूचित करण्यात आले.

यावेळी बैठकीचे सूत्रसंचालन पत्रकार संजय कोलते यानी केले. पोलीस पाटील, पत्रकारांसह भीम जयंती मंडळाचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्षांचे प्रमुख कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते. मुदखेड तालुक्यातील भीम जयंती शांततेत साजरी करण्याची ग्वाही भीम जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम उत्साहात संपन्न



**भोकर (प्रतिनिधी)**– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती भोकर शहरात उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

यावेळी घेण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात 'एक निळा आणि एक भगवा', दाही दिशामध्ये लावी दिवा, जिजाऊचा शिवा, भीमाईचा भिवा' यासह विविध प्रबोधनात्मक गीतांनी शाहीरा सीमाताई पाटील यांनी सोमवारी रात्री भोकरवासीयांची मने जिंकली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने दि.२० एप्रिल रोजी रात्री येथील मोंढा मैदानात सुप्रसिद्ध शाहीरा सीमाताई पाटील व जालीदादा मोरे यांनी सादर केलेल्या 'एक त्या रायगडावर, एक त्या चवदार तळ्यावर' फेम 'जागर महामानवाचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तथागताला वंदन गीत समर्पित करून सीमाताई पाटील यांनी भीम गीतांना आरंभ केला.

छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या गीतांनी उपस्थित मंत्रमुग्ध झाले. समतेचे, क्रांतीचे, अंधश्रध्देवर प्रहार करणाऱ्या त्यांच्या गीतातून महामानवांच्या विचारांचा जागर झाला. त्यांच्या ओजस्वी आणि प्रभावी गीतांनी वैचारिक प्रबोधन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील परदेशातूनी आले हो तुम्ही, या वास्तववादी गीतांनी महिलांना आपले अश्रू आवरता आले नाहीत.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, जिजाऊ, रमाई, सावित्री, संत गाडगेबाबा, अंगुलीमाल यांचा अभिनव उपस्थितांच्या मनात घर करून गेला तर पहिले माझे वंदन गं हे गीत महापुरुषांना घडवणाऱ्या त्यागमूर्ती महिलांवर सादर करून त्यांनी कार्यक्रमात आनंद, उत्साह निर्माण केला. त्यांनी आपल्या क्रांतिकारी गीतातून सामाजिक समतेची शिकवण उपस्थितांसमोर सादर केली तर समाजातील रूढी, परंपरा, विषमता यावर जोरदार हल्ला केला. त्यांच्या गीतांनी ऊर्जा, प्रेरणा दिली, इतिहास सांगितला तर भविष्य घडविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाला किती महत्व दिले यावरही त्यांनी प्रबोधन केले.

# घुंगराळा येथे भीम जयंती मंडळाची कार्यकारिणी जाहीर

**नायगाव (प्रतिनिधी)**– नायगाव तालुक्यातील घुंगराळा येथे येत्या २९ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती साजरी करण्यात येणार असून, त्या अनुषंगाने सार्वजनिक भीम जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

सेवानिवृत्त कर्मचारी एस. के. गजभारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वंचित बहुजन युवा आघाडी चे जिल्हा उपाध्यक्ष दीपक गजभारे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यावेळी निवडण्यात आलेली कार्यकारिणी अशी- अध्यक्ष- संघरत्न ढवळे, सचिव सचिन गजभारे. उपाध्यक्ष सिद्धांत पट्टेकर, कोषाध्यक्ष माधव गजभारे, सहकोषाध्यक्ष पुंडलिक आढाव, सल्लागारपदी प्रभता हाणमंते यांची नियुक्ती करण्यात आली.

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

## घरीच करा मेनिक्युअर

**अनेक महिलांना कोरडे, खडबडीत तळवे असण्याची समस्या असते. भांडी धुणे, कपडे घासणे आणि इतर कामे करताना हातांची त्वचा खूप खडबडीत होते. पण ही बाजू बहुतेक महिलांच्या लक्षात येत नाही. सहसा प्रत्येक स्त्री चेहऱ्याची त्वचा आणि चमक याकडे लक्ष देते. पायही स्वच्छ होतात, पण तळवे सुंदर आणि मऊ ठेवण्याकडे थोडे कमी लक्ष देतात. पण तुम्हाला चांगल्या तळव्यांचीही गरज असते. जर काम करून तुमचे हात कडक झाले असतील तर घरच्या घरी तुम्ही तुमच्या हातांची काळजी घेऊ शकता. चला तर मग जाणून घेऊयात तुम्ही तुमच्या हातांची काळजी कशी घ्याल. चला तर मग जाणून घेऊयात कोणत्या आहेत त्या गोष्टी...**



- तळवे अन् नखे खडबडीत का होतात.... : तळवे खडबडीत होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे स्वयंपाकघरातील काही कामात आणि घराची साफसफाई करताना वापरले जाणारे केमिकल जर तुम्ही तुमची घरातील भांडी स्वतः धुत असाल, तर भांडी धुण्यासाठी वापरण्यात येणारा साबण तुमच्या हाताची त्वचा लवकर खराब होईल. तसेच हाताने कपडे धुणाऱ्या महिलांना डिटर्जंट देखील परिणाम करते. या गोष्टींमुळे हातातील मऊपणा हिरावला जातो.
- ही खबरदारी ठेवा... : तुम्ही भांडी धुण्यासाठी जात आहात किंवा कपडे धुण्याची तयारी करत आहात किंवा असे कोणतेही काम करायचे आहे ज्यामध्ये तळवे थेट केमिकलच्या संपर्कात येतात. अशा परिस्थितीत, डिस्पोजेबल हातमोजे घालणे लक्षात ठेवा. यामुळे तुमच्या हातांना त्रास होणार नाही.
- मऊ हातांसाठी या टिप्स फॉलो करा : विशिष्ट प्रकारचे तेल वापरण्याची सवय लावा. भांडी किंवा कपडे धुतल्यानंतर तुम्ही तुमच्या हातावर बेबी ऑइल लावू शकता. तुम्ही खोबरेल तेल देखील वापरले जाऊ शकते. पेट्रोलियम जेलीच्या प्रभावामुळे हातही मऊ होतात. तुम्ही सर्व कामातून मोकळे झाल्यानंतर तुमच्या हातावर व्हिनेगरही लावू शकता. लिंबू आणि मीठ नेहमी तुमच्या किचन सिंकजवळ ठेवा. काम संपताच हे दोन्ही मिसळा आणि तळहातांना हलके मसाज करा आणि नंतर धुवा.

### या गोष्टी लक्षात ठेवा

हात मऊ ठेवण्यासाठी इतर काही गोष्टींची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. ज्यामध्ये सर्वप्रथम हे लक्षात ठेवा की हँड ड्रायरचा जास्त वापर करू नका. त्याचा वारंवार वापर केल्याने तळहातांच्या त्वचेचे नुकसान होते. जेव्हा शक्य असेल तेव्हा सॅनिटायझर वापरल्यानंतर हात चांगले धुवा. तळहातांवर मॉइश्चरायझर लावा यामुळे तुमचे हात नरम होण्यास मदत होईल.

### हे काम आठवड्यातून एकदा करा

आठवडाभर काम करून तळवेही थकतात. आठवड्यातून एकदा तरी कोमट पाण्यात हात टाकून तळहातांना आराम द्या. तुम्ही कोमट पाण्यात शॅम्पू देखील मिक्स करू शकता. जर तुम्हाला ते नको असेल तर त्यात खडे मीठ आणि लिंबू घाला. या पाण्यात आपले तळवे बुडवून ठेवा. यामुळे तुमचे हात नरम होण्यास मदत होईल.

## चेहऱ्यावर वाफ घेणे चांगले की वाईट?



**बरेचदा डोक्यावर टॉवेल घेऊन पाण्याची वाफ घेताना ब्युटी पार्लरमध्ये लोकं दिसतात. पण नेमकं असं का केलं जातं याचा नक्की चेहऱ्यासाठी काय फायदा होतो याबाबत ब्युटिशियननी योग्य माहिती दिली आहे. वाफ घेताना बरेच जण गरम पाण्यात कडूलिंबाची पानं, मीठ आणि लिंबासारख्या पदार्थांचाही वापर करतात. यामागे नक्कीच त्वचेसंबंधित काही रहस्य असतील. अनादी काळापासून चेहऱ्यासाठी ही ट्रिक वापरली जाते. मात्र त्वचा चांगली राखण्यासाठी चेहऱ्यावर पाण्याची वाफ नक्की काय घ्यायची याचं वैज्ञानिक कारणंही तितकंच महत्त्वाचं आहे. चेहऱ्यावर वाफ घेण्याचे अनेक फायदे आहेत आणि तेच आपण जाणून घेऊया...**



- चेहऱ्याचे क्लिन्झिंग : ज्या व्यक्ती नियमित चेहऱ्यावर वाफ घेतात, त्यांच्या त्वचेचे पोर्स ओपन होतात आणि त्यातून जमा झालेली सर्व घाण आणि डेड स्किन निघून जाण्यास मदत मिळते. त्यामुळे चेहऱ्यावर डाग दिसून येत नाही. ज्या व्यक्तींना ब्लॅकहेड्स आणि व्हाईटहेड्सचा त्रास आहे त्यांनी तर महिन्यातून किमान एकदा तरी चेहऱ्यावर वाफ घ्यायला हवी. चेहऱ्यावर वाफ घेणे रामबाण उपाय ठरत असून क्लिन्झिंग होण्यास मदत मिळते.
- रक्ताभिसरण प्रक्रिया होते अप्रतिम : तुम्ही त्वचेची कितीही का काळजी करत असाल पण तरीही त्वचा कधी ना कधीतरी निस्तेज दिसते आणि डिहायड्रेटही होते. अशावेळी स्टीम घेणे हा उत्तम पर्याय ठरतो. चेहऱ्यावर अशा वेळी वाफ घेतल्याने रक्तप्रवाह चांगला होतो आणि चेहरा अधिक चमकदार आणि ताजातवाना दिसतो. त्यामुळे महिन्यातून किमान एकदा तरी फेस स्टिमिंग करावे.
- स्क्रिन हायड्रेशन : अनेकदा कामामध्ये आपण शरीराला आवश्यक इतके पाणी प्यायला विसरतो. त्यामुळे आपल्या चेहऱ्याची त्वचा डिहायड्रेट होऊ लागते. त्वचेची क्षमता वाढविण्यासाठी चेहऱ्यावर वाफ घ्यायला हवी. यामुळे त्वचेचे हायड्रेशन उत्तम राहाते आणि त्वचा निस्तेज आणि काळी दिसत नाही. असे केल्यामुळे तुमचा चेहरा नेहमी फ्रेश दिसतो.

### त्वचेला तरुण ठेवण्यास फायदा

चेहऱ्यावर वाफ घेतल्याने कोलेजन आणि अलास्टिनचे उत्पादन वाढते आणि त्यामुळे आपला चेहरा अधिक तरुण आणि चमकदार दिसण्यास मदत मिळते. अनेकदा स्किन केअर एक्सपर्टकडून आठवड्यातून ३ वेळा तरी चेहऱ्यावर वाफ घेण्याचा सल्ला देण्यात येतो. मात्र तुम्हाला तितका वेळ नसेल तर तुम्ही किमान १५ दिवसांत एकदा वाफ घ्यावी. तुम्हालाच काही दिवसात फरक जाणवेल.

## बटाटा देईल फेशिअलसारखी ग्लोईंग त्वचा!

**प्रत्येक घरात असणारी एक भाजी म्हणजे बटाटा. सर्वांना आवडणाऱ्या या भाजीचे त्वचेसाठीही खूप फायदेशीर आहे. चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्यातही बटाटा खूप फायदेशीर मानला जातो. बटाट्यामध्ये त्वचा सुधारण्यासाठी सर्व गुणधर्म आहेत. जर तुम्हाला नितळ आणि चमकदार त्वचा हवी असेल तर तुम्ही बाटाट्याचा वापर करून फेशियल करू शकता.**



कच्च्या बटाट्यातील पोषण तत्त्वांमुळे चेहऱ्यावरील डाग, मुरुम, त्वचेशी संबंधित अन्य समस्या दूर होण्यास मदत मिळू शकते. तुमच्या त्वचेवर डाग, मुरुम, सुरकुत्या इत्यादी समस्या निर्माण झाल्या असल्यास उपाय म्हणून कच्च्या बटाट्याचा उपयोग करा. नियमित हा उपाय केल्यास तुम्हाला आपल्या त्वचेमध्ये एका आठवड्यातच सकारात्मक बदल पाहायला मिळतील. बटाट्यामध्ये नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म असल्यामुळे त्वचेवरील काळेपणा आणि डाग कमी होण्यास मदत होते. यामध्ये असलेले व्हिटॅमिन C त्वचेला उजळपणा देऊन तजेलदार बनवते. डोळ्यांखालील काळी वर्तुळे कमी करण्यासाठीही बटाटा उपयुक्त ठरतो. तसेच, बटाट्याचा रस त्वचेला थंडावा देऊन सूज आणि जळजळ कमी करतो. नियमित वापरामुळे त्वचा नितळ, मऊ आणि चमकदार दिसू लागते. बटाट्याचा वापर करण्यापूर्वी त्वचेवर छोटासा पॅच टेस्ट करून घ्या. कारण काहींना त्याची ॲलर्जी होऊ शकते. बटाट्याचा रस जास्त वेळ चेहऱ्यावर ठेवू नये. १०-१५ मिनिटे पुरेसे असते. संवेदनशील त्वचा असल्यास दररोज वापरण्याऐवजी आठवड्यातून २-३ वेळाच वापर करा. डोळ्यांच्या अगदी जवळ लावताना काळजी घ्या. तसेच, वापरल्यानंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुऊन हलका मॉइश्चरायझर लावणे आवश्यक आहे, जेणेकरून त्वचा कोरडी पडणार नाही.

- बटाट्यामध्ये असणारे पोषक तत्त्वे : बटाट्याचा त्वचेला होणारा फायदा जाणून घेण्याआधी बटाट्यातील पोषक तत्वे कोणती आहेत ते प्रथम जाणून घेऊया. बहुतेक लोकांचा असा विश्वास आहे की बटाटा म्हणजे स्टार्च जास्त प्रमाणात असणे त्यामुळे चरबी वाढवते. पण बटाट्यामध्ये प्रथिने देखील असतात. त्याच प्रमाणे फायबर, व्हिटॅमिन-सी, बी- ६, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम देखील समृद्ध आहे. याशिवाय, बटाट्यामध्ये फॉस्फरस, सारख्या पोषक तत्वांचा समावेश असतो.
- दह्यात बटाटे मिसळून लावा : दही चेहऱ्यासाठी खूप फायदेशीर आहे. दही त्वचेला हायड्रेट करण्यासाठी आणि अतिरिक्त तेल शोषण्यासाठी मदत करते. बटाटे आणि दह्याचा फेस पॅक करण्यासाठी प्रथम बटाटे मिक्सरमध्ये टाकून बारीक करा त्यात दही आणि चिमूटभर हळद मिसळा. ब्रश किंवा हाताच्या मदतीने चेहऱ्यावर लावा. १५ मिनिटांनी चेहरा धुवा.
- एलोवेरा जेल आणि बटाटे : हा फेसपॅक करण्यासाठी बटाटे बारीक करून घ्या किंवा बटाटे उकळवून मॅश करा. मॅश केलेल्या बटाट्यामध्ये एलोवेरा जेल मिक्स करा. ही पेस्ट चेहऱ्यावर लावा आणि किमान १५ मिनिटे तशीच राहू द्या. तुमचा चेहरा सामान्य पाण्याने धुवा आणि तुम्हाला तुमच्या त्वचेतील फरक लक्षात येईल.
- तांदूळ आणि बटाटे : हा फेसपॅक तयार करण्यासाठी एक वाटी तांदूळ घ्या आणि ब्लेंडरमध्ये बारीक करा. पावडर किंचित खडबडीत असावी. त्यात मॅश केलेला बटाटा किंवा त्याचा रस मिसळा. हवे असल्यास थोडे दहीही घालावे. या पेस्टने चेहरा स्क्रब करा. डेड स्किन काढून टाकण्यासोबतच ते स्किन टाइटनिंगचेही काम करेल.
- बटाट्याची साल : जेव्हा असं काही करायला वेळ नसतो, तेव्हा बटाट्याची साल तुमच्या कामी येईल. फक्त ही साले घ्या आणि चेहऱ्यावर ५ मिनिटे चोळा. थंड पाण्याने चेहरा धुवा. असे केल्याने चेहऱ्यावरील डाग हलके होण्यास मदत होईल आणि त्वचा देखील स्वच्छ होईल.

## हात हातांना असे बनवा आकर्षक...

**जाड हातांमुळे तुम्हाला स्लिव्हलेस घालण्याची लाज वाटते का? यामुळे तुम्हाला चांगल्या फिटिंगचे किंवा स्लीव्हलेस कपडे घालता येत नाहीत का? तुम्ही देखील या समस्येला सामोरे जात असाल तर काही योगा प्रकार तुम्हाला मदत करू शकतील. यासाठीच आम्ही काही योगा प्रकार सांगत आहोत...**

जेव्हा परफेक्ट फिगची चर्चा होते तेव्हा प्रथम पोट आणि नंतर हाताच्या दंडाबद्दल बोलले जाते. कारण आपल्या शरीरात वाढत चाललेल्या चरबीचा परिणाम हातावर दिसून येतो. त्याच वेळी, अनेक लोकांच्या शरीराची रचना अशी असते की त्यांचे हात शरीराच्या इतर भागांपेक्षा वेगळे आणि जाड दिसतात. अशा वेळी त्या व्यक्ती स्लिव्हलेस ड्रेस घालत नाही. तुम्ही देखील या समस्येला सामोरे जात असाल तर काही योगा प्रकार तुम्हाला मदत करू शकतील.



» पूर्वोत्तानासन : खाली बसा यानंतर तुमचे पाय तुमच्या समोर सरळ पसरवा. आता आपले हात बाजूला घेऊन तळवे जमिनीवर घट्ट ठेवा. आपले पाय थोडेसे वाकवा आणि नंतर हातांवर जोर देताना शरीर वर उचलण्यास सुरुवात करा. आता वाकलेले पाय एक एक करून सरळ करा. हे आसन किमान तीन ते पाच वेळा करा.

» चतुरंग दंडासन : सर्वप्रथम, तुमचे शरीर अधोमुख स्वानसनाच्या आसनात आणा. यानंतर , शरीराला एका स्थितीत ठेवा या दरम्यान, आपले हात आणि पाय पूर्णपणे सरळ ठेवा. शरीराचा बराचसा जोर हाताच्या तळहातावर आला पाहिजे. आता हळू हळू जमिनीच्या दिशेने या आणि ही मुद्रा थोडावेळ धरून ठेवा, नंतर वर जा. असे केल्याने ट्रायसेप्स आणि बायसेप्स काम करतात आणि चरबी कमी होऊ लागते.

» भुजंगासन : या आसनासाठी पोटावर झोपा. हात दुमडून दोन्ही तळवे छातीच्या बाजूला जमिनीकडे ठेवा. दीर्घ श्वास घ्या आणि मान आणि डोके वर उचला. या दरम्यान, लक्षात ठेवा की पाय जोडलेले असले पाहिजेत आणि कोपर शरीराला आतील बाजूस लागून असावे. श्वास सोडताना डोके आणि मान खाली आणा. पोझ तीन ते पाच वेळा करा. या आसनामुळे त्या भागावर साठलेली चरबी कमी होते.

» सिंगल आर्म हाई प्लॅंक : यासाठी जमिनीवर पोटावर झोपा. आता तळवे खांद्याच्या ओळीत पुढे आणा आणि त्यांना जमिनीवर स्वतःला झोकून द्या. आता हातांवर जोर देताना, वरच्या दिशेने वर जा. एका हातावर जोर देऊन, दुसऱ्या हाताला हवेत उचला. काही सेकंद या आसनात राहा. दुसऱ्या हाताने समान गोष्ट करा. शरीराचा भार एका हातावर आला की स्नायूंना जास्त काम करावे लागते. यामुळे चरबी कमी होण्यास मदत होते.

## या 5 गोष्टी थेट लावू नका चेहऱ्यावर!

**सुंदर दिसणं कोणाला आवडत नाही? आपण चारचौघींत उठून दिसावं असं प्रत्येकीला वाटत असतं. सुंदर त्वचा मिळावी म्हणून अनेक जण खूप गोष्टी करतात. चेहरा उजळण्यासाठी आपण अनेक गोष्टींचा वापर करतो. यासाठी काही लोक महागडी उत्पादने वापरतात, तर काही घरात असणाऱ्या गोष्टींचा वापर करतात. पण या सर्वांचा आपल्या त्वचेवर थेट परिणाम होतो. पण काही घटकांचा आपल्या त्वचेवर वाईट परिणाम होतो. जर आपण काही गोष्टींचा थेट चेहऱ्यावर मारा केला तर आपल्याला अकाली वृद्धत्व येऊ शकते. त्याचप्रमाणे चेहऱ्याचा पोतदेखील बिघडू शकतो.**



- लिंबाचा त्वचेवर थेट वापर : प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आपण आहारामध्ये लिंबूचा वापर करायचा सल्ला दिला जातो. काहीवेळी त्वचेची काळजी घेण्यासाठी लिंबूचा वापर केला जातो. लिंबूमध्ये असणारे व्हिटामिन सी हे त्वचेसाठी खूप फायदेशीर असते. पण लिंबूमध्ये सायट्रिक ॲसिडदेखील असते ज्यामुळे त्वचेचे नुकसान होऊ शकते. जर तुम्ही लिंबाचा रस वापरणार असाल तर पाच थेंबापेक्षा अधिक याचा वापर करू नका. लिंबाचा रस किंवा साल त्वचेसाठी फायदेशीर असते. पण त्याचा वापर कसा करावा यावर मात्र लक्ष देणं गरजेचं असते.
- टुथपेस्ट : त्वचेच्या उपायांवर घरातील टुथ पेस्टचा वापर सर्रास केला जातो. पण असे केल्यास त्वचेचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे असं करणं टाळा. त्यामध्ये असणारे केमिकल तुमच्या त्वचेचे दीर्घकाळासाठी नुकसान करू शकतात. त्यामुळे टुथपेस्टचा वापर टाळाच.
- पिंपल्सवर लसून लावू नका : काही जण त्वचेवरील पिंपल्सवर लसून लवतात. पण लसून हा उग्र पदार्थ आहे त्याचा त्वचेवर थेट परिणाम होतो. त्यामुळे त्वचेचे नुकसान होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे असे करू नका.



- बेकिंग सोडा : चेहऱ्यावरील डाग कमी करण्यासाठी काही लोक बेकिंग सोडाचा वापर करतात. पण असे केल्यास त्यांच्या त्वचेवर दीर्घपरिणाम होऊ शकतो. या गोष्टीमध्ये ईनोसारख्या गोष्टींचाही समावेश होतो. त्यामुळे या गोष्टी चेहऱ्याला लावणे टाळा.
- बेटनोव्हेट : बेटनोव्हेट हे एक स्टिरॉइड आहे जे तात्पुरते लालसरपणा कमी करते. पण त्यामुळे त्वचेवर बॅक्टेरिया आणि बुरशीची अतिवृद्धी होऊन मुरुमे आणखी वाईट होतात. त्यामुळे चेहऱ्याचा स्थिती अजूनच वाईट होऊ शकते. त्यामुळे याचा वापर टाळाच.
- दही आणि बेसन : जर तुम्हाला नितळ त्वचा हवा असेल तर दही आणि बेसन याचे फेसपॅक लावू शकता. यामुळे चेहऱ्याचा पोत सुधारण्यास मदत होईल. त्या प्रमाणे यामुळे चेहऱ्याचे कोणताही नुकसान होत नाही. यामुळे तुमचा रंग सुधारण्यासही मदत होईल. त्यामुळे या दोन गोष्टींपासून बनलेला फेसपॅक तुम्ही वापरू शकता.

# अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर ३२ बालविवाह रोखले; 'स्पेशल फोर्स'ची राज्यव्यापी कारवाई

मुंबई (प्रतिनिधी) - राज्यात अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर महिला व बाल विकास विभागाने 'स्पेशल फोर्स'च्या माध्यमातून मोठी कारवाई करत एकाच दिवशी तब्बल ३२ बालविवाह रोखण्यात यश मिळवले असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ नुसार १८ वर्षांखालील मुलगी व २१ वर्षांखालील मुलाचा विवाह लावणे हा दंडनीय गुन्हा असून, बाल विवाह मुक्त राज्य बनविण्यासाठी महिला व बालविकास विभाग बाल विवाह मुक्त भारत हे अभियान राबवित असून, अतिशय कडक कारवाई करत राज्य देशात आघाडीवर आहे.

अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर काही भागांत पारंपरिक पद्धतीने अल्पवयीन बालकांचे विवाह लावण्याची प्रथा अद्यापही आढळून येते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने बाल विवाह मुक्त भारत या १०० दिवसांच्या अभियानांतर्गत व्यापक जनजागृती, समन्वय आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून यंत्रणा अधिक सजग केली आहे. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, प्रकरण व्यवस्थापन, कुटुंबाचा सातत्याने पाठपुरावा, तसेच शिक्षण, कौशल्य विकास, समुपदेशन आणि पोषण सेवांशी समन्वय साधण्याचे काम या अभियानामार्फत राबविण्यात आले होते. यामध्ये कोकण विभाग (रायगड) २ बालविवाह, पुणे विभाग (पालघर) १, नाशिक विभाग सांगली (१), नाशिक (२), अहिल्यानगर (५), छत्रपती संभाजीनगर विभाग परभणी (१), लातूर (१), बीड (३), हिंगोली (१), धाराशिव (२), संभाजीनगर (४), बुलडाणा (१), अमरावती विभाग अकोला (४), नागपूर विभाग यवतमाळ (२), चंद्रपूर (२) असे एकूण ३२ बालविवाह रोखण्यात यश मिळाले. बालविवाह हा केवळ कायद्याचा भंग नसून बालकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे.

# संपामुळे मंत्रालयातील कामकाजावर परिणाम; निम्मे कर्मचारी गैरहजर

**मुंबई (प्रतिनिधी)** - विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मध्यवर्ती संघटनेने मंगळवारपासून पुकारलेल्या संपाचा परिणाम मंत्रालयातील कामकाजावर जाणवला. मंगळवारी संपाच्या पहिल्या दिवशीच मंत्रालयातील सुमारे निम्मे कर्मचारी अनुपस्थित राहिल्याने त्याचा फटका कामाच्या निमित्ताने मंत्रालयात आलेल्या अभ्यागतांना बसल्याचे दिसून आले. मागण्या मान्य झाल्याशिवाय संप मागे न घेण्याच्या निर्णयावर कर्मचारी संघटना ठाम आहे.

जुनी सेवानिवृत्ती योजना लागू करावी, शासकीय रिक्त पदे भरावीत यासह आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील सुमारे १७ लाख सरकारी, जिल्हा परिषद तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सुरू झालेल्या संपात सहभागी झाले आहेत. कर्मचाऱ्यांनी त्यांचे आंदोलन मागे घेण्यासाठी राज्य सरकारकडून कोणत्याच हालचाली होत नसल्याने संप आज, बुधवारीही सुरू राहण्याची शक्यता आहे.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपात मंत्रालयातील कर्मचाऱ्यांनी सहभागी होत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. परिणामी मंत्रालयातील एकूण ७हजार कर्मचाऱ्यांपैकी आज केवळ ३६१९ कर्मचारी उपस्थित राहिल्याची नोंद करण्यात आली. त्यामुळे विविध विभागातील कामाची गती मंदावली होती. या संपामुळे नागरिकांची प्रलंबित कामे आणखी खोळंबण्याची शक्यता आहे.

# मुंबई-पुणे 'एक्स्प्रेस वे' उद्यापासून दोन दिवस बंद

**मुंबई (प्रतिनिधी)** - महाराष्ट्रातील सर्वाधिक प्रवासी आणि माल वाहतूक करणाऱ्या रस्त्यांपैकी एक असलेला मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे दोन दिवस बंद राहणार आहे. यासंदर्भातील तारीख आणि वेळ नुकतीच जाहीर करण्यात आली असून या वेळेनुसार प्रवाशांनी आपल्या प्रवासाचं नियोजन करावं असं आवाहन करण्यात आलं आहे.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर २३ व २४ एप्रिल रोजी प्रत्येकी तीन तास वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत डोंगरगाव-कुसगाव परिसर (किमी. क्र. ५८/५००) येथे डागडुजीचं काम केलं जाणार आहे. पुलाचे शटरिंग काढणे आणि रंगकाम करण्यासाठी हा मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हे काम केलं जाणार आहे. परिणामी, वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागणार आहे.

२३ एप्रिल रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद राहील. या कालावधीत सर्व वाहने किवळे, देहूरोडमार्गे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर वळवून कुसगाव टोल प्लाझामार्गे पुढे सोडण्यात येणार आहे. त्यानंतर २४ एप्रिल रोजी याच वेळेत पुण्याकडे जाणारी वाहतूक बंद ठेवली जाणार आहे.


## Change In Name

My old Name is **AKHTARI BEGUM** Which now I am Changing as New Name **AKHTARI BEGUM SAYYED SALIM** Henceforth my all correspondence will be done as per my new name.Please consider the name

**Address: GALLI NO.7, PER BURHAN NAGAR, TARODA BK. NANDED-431605**
**Mob: 8600874441**



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, खालील सारणीमध्ये दर्शविलेल्या जमीन मालकांची शेतजमीन त्यांचे नावापुढे दर्शविलेल्या वर्णनानुसार कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेर्तंगत खरेदी करावयाचे योजिले आहे.

| अ. क्र. | शेतजमीन विक्रेत्यांचे नाव | गाव | तालुका | गट क्रमांक | एकुण क्षेत्र हेक्टर आर मध्ये | एकुण क्षेत्र एकर आर | | चतु: सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पुर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | श्री. हिरामण धर्मा राठोड | सिंदगी | किनवट | ३८ | ० हे. ८० आर | २ एकर | ० आर | म्हैसुरा | म्हैसुरा | म्हैसुरा | गट क्र.३८ श्रीम.शितल प्रविण जाधव यांचे शेतजमीन |
| २ | श्रीमती शितल प्रविण जाधव | सिंदगी | किनवट | ३८ | १ हे. २० आर | ३ एकर | ० आर | गट क्र.४२ | म्हैसुरा | गट क्र.३८ श्री हिरामण धर्मा राठोड यांचे शेतजमीन | गट क्र.३९ श्रीम.सुनिता हिरामण राठोड यांचे शेतजमीन |
| ३ | श्रीमती सुनिता हिरामण राठोड | सिंदगी | किनवट | ३९ | ३ हे. ३० आर | ८ एकर | १० आर | गट क्र.४० श्री भोजु अनसिंग यांचे शेतजमीन | म्हैसुरा | गट क्र.३८ श्री हिरामण धर्मा राठोड यांचे शेतजमीन | गट क्र.३९ श्री उमेश हिरामण राठोड यांचे शेतजमीन |
| ४ | श्री. उमेश हिरामण राठोड | सिंदगी | किनवट | ३९ | ३ हे. ३१ आर | ८ एकर | ११ आर | गट क्र.४० श्री भोजु अनसिंग यांचे शेतजमीन | म्हैसुरा | गट क्र.३९ श्रीम.सुनिता हिरामण राठोड यांचे | म्हैसुरा |
| | | | | | | २१ एकर | २१ आर | | | | |

वरील शेत जमीनी, वर दर्शविलेल्या चतु:सिमेच्या वर्णनाप्रमाणे आंतरीक व बाहय हक्कांसह शासन खदेरी करणार असुन त्यानुषंगाने जमीन विक्रेत्यांनी बंधपत्र या कार्यालयास सादर केलेले असुन खरेदी प्रक्रीया चालु आहे. सदर जमीनीचे खरेदी विक्री बाबत कुणाचा काही आक्षेप असल्यांस किंवा सदर शेतांवर कुणाचाही बोजा असल्यांस किंवा हक्कसंबंध असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ७ दिवसांचे आंत सहायक आयुक्त समाज कल्याण, नांदेंड यांचे कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नांदेड यांचेकडे आक्षेपपुष्टयर्थ उपलब्ध पुराव्यांसह लिखीत स्वरुपात आक्षेप नोंदवावेत. वरील मुदतीत आक्षेप किंवा उजर न आल्यास सदरील शेत बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन शेतीची रजिस्र्ड खरेदी खत स्वत : च्या हक्कात शासन करुन घेईल. मुदतीनंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

जाहिर प्रगटन :- दि.२२.०४.२०२६
स्थळ:- नांदेड

शिवानंद मिनगीरे
सहायक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. नायगाव (खै.), जि. नांदेड यांचे कार्यालय,
दत्त नगर नरसी रोड, नायगांव (बा.), जि. नांदेड
Email ID- arcs.naigaon@rediffmail.com

जा.क्र.सनिसस/कक्ष-1/निवडणुक पतसंस्था/सेवा/प्रारुप/यादी/प्रसिध्दी/ 112 /2026 दि. 21 /4/ 2026

**व्यवस्थापक समिती पंचवार्षिक निवडणुक कार्यक्रम सन 2026 ते 2031**
**(क वर्ग संस्था) मतदार यादीचा कार्यक्रम (फक्त सभासदांकरीता)**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960, सुधारणा 2013 चे कलम 73 (क) (ब)व त्या खालील नियम 2014 चे नियम 6 ते 10 मधील तरतुदीनुसार एक (01) मराठावाडा महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था म. पिपळगांव, सेवा सहकारी संस्था धनज या संस्थेच्या प्रारुप मतदार यादया दिनांक 1/2/2026 या अर्हता दिनांकावर तयार केल्या असुन एकुण (01) मराठावाडा महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था म. पिपळगांव, सेवा सहकारी संस्था धनज या संस्थेच्या संस्थांच्या प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करीत आहे.

**संस्थेचे नांव:-**

1. मराठावाडा महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था म. पिपळगांव, ता नायगांव
2. सेवा सहकारी संस्था म. धनज ता नायगांव


| अ.क्र | तपशिल | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | 23/04/2026 | स.11.00 वाजता | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता.नायगाव (खै) व संबंधीत संस्थेच्या सुचना फलकावर |
| 2 | प्रारुप मतदार यादीवर हरकती/ आक्षेप मागविणे | 23/04/2026 ते 30/04/2026 | कार्यालयीन वेळेमध्ये सु-टीचे दिवस वगळुन | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,ता. नायगाव (खै) यांचे कार्यालयात. |
| 3 | प्रारुप मतदार यादीवर हरकती/ आक्षेप वर निर्णय घेणे | 4/05/2026 | दुपारी 1.00 वाजता | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. नायगाव (खै) यांचे कार्यालयात. |
| 4 | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | 5/05/2026 | दुपारी 4.00 वाजता | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. नायगाव (खै) व संबंधीत संस्थेच्या सुचना फलकावर |

(एम.एल. चौधरी)
तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. नायगाव (खै)

**प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.**
1.मा. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड.
2.प्रस्तुत कार्यालयाचे सुचना फलकावर प्रसिध्दीसाठी.
3.संस्थेच्या सुचना फलकावर प्रसिध्दीसाठी
4.संपादक, सत्यप्रभा यांना देवुन विनंती कीदिनांक 23/ 4 /2026 रोजी प्रसीध्द होणा-या अंकात सदरील मतदार यादी कार्यक्रमास जाहीर प्रसीध्दी दयावी.

तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. नायगाव (खै)

ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥



ਤਖ਼ਤ ਸੱਚਖੰਡ ਸ੍ਰੀ ਹਜ਼ੂਰ ਅਬਿਚਲਨਗਰ ਸਾਹਿਬ, ਨਾਂਦੇੜ- ੪੩੧ ੬੦੧ (ਮਹਾਰਾਸ਼ਟਰ)-ਭਾਰਤ
Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431 601 (Maharashtra) - India
Ph.No. 02462-234813, 241266, 243559
E-Mail:- contact@hazursahib.com roombooking@hazursahib.com Visit us at :- http://www.hazursahib.com

No. 213/26-27 Date 22/4/26

## Appointments

Gurudwara Sachkhand Board, Nanded is willing to appoint the following for starting Medical college Dental, Nursing, Pharma and Agriculture colleges under the university -

### Architect

1) Eligibility: Bachelor of Architecture from a recognized university / institution. Candidates possessing higher education & specialization in Green Building Architect is preferable.
2) Experience: Minimum 05 years of experience.
3) Candidate should not consume any kind of intoxicant.

### Consultant

1) Eligibility: Should have the knowledge and experience in seeking the permission to start the new Medical college.
2) Experience: Minimum 10 years of experience.
3) Candidate should not consume any kind of intoxicant.

- The candidate will have to attend interview at his own cost.
- Selected candidate will be on probation period for six months.
- The application with resume should be submitted latest by Dt: 29/04/2026 with passport size photo along with testimonials on the address given below.
- All the rights to reject any of the application without assigning any reason are reserved with the Superintendent Gurudwara Sachkhand Board, Nanded.

Address for correspondence :- Superintendent,
Gurudwara Takhat Sachkhand Board, Nanded - 431601.
E-mail - contact@hazursahib.com

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई; १३. ४० लाखांचा गांजा जप्त, १७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या नांदेड ग्रामीण पोलिसांनी नाकाबंदी दरम्यान मोठी कारवाई करीत तेलंगणा राज्यातून महाराष्ट्रात अवैधरित्या आणला जाणारा १३.४० लाखांचा गांजा पकडला. या प्रकरणात १७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दोघांना अटक केली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत जिल्ह्यात अवैध धंदे, गुन्हेगारी आणि अंतरराज्य तस्करी रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने नांदेड ग्रामीण पोलिसांकडून चंदासिंग कॉर्नर परिसरात नाकाबंदी करण्यात आली होती. नाकाबंदी दरम्यान देगलूरकडून नांदेडकडे येणारी मारुती कंपनीची डिझायर कार संशयास्पदरीत्या वेगाने येताना दिसली. पोलिसांनी वाहन थांबवण्याचा इशारा दिल्यानंतर चालकाने पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्परतेने पाठलाग करून वाहन अडवले.

वाहनाची झडती घेतली असता कारच्या डिकीत पांढऱ्या रंगाच्या पिशवीमध्ये चिकट टेपने गुंडाळलेले बॉक्स आढळून आले. या बॉक्समध्ये हिरव्या रंगाचा पाला व काड्या असलेला गांजा सापडला. तपासात हा गांजा तेलंगणा राज्यातील बोधन परिसरातून आणण्यात आल्याचे समोर आले.

या प्रकरणातील मुख्य आरोपी अकबर अहमद खान पठाण याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, चौकशीतून इतर साथीदारांची नावे समोर आली. त्यात माधव विठ्ठल जाधव राहणार आंबेजोगाई–बीड, अतुल कवडे राहणार धर्मापुरी तांडा कंधार, बालाजी कांबळे दीपक नगर नांदेड, शंकर ओमार राहणार नांदेड, संत कारणेवाड सांगवी नांदेड, शेख शफी वसंतनगर नांदेड, शेख सादिक नुरी चौक नांदेड, मोहमद इसाक मोहम्मद युसूफ राहणार नुरी चौक नांदेड, मोहमद हमीद शिवाजीनगर नांदेड, लंगड तशू बिलाल नगर, नवाब, रौफ, संघर्ष पावल आणि २ अनोळखी अशा एकूण १७ आरोपींविरुद्ध गुंगीकारक औषधे व पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईदरम्यान गांजासह वापरलेली कार असा एकूण १३.४० लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या कारवाईत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले, बापूराव चव्हाण, ज्ञानेश्वर मठवाड, पोलीस अंमलदार समीर अहेमद, वसंत केंद्रे, कल्याणकर, शंकर माळगे, पवार, सिरमलवर, देवकत्ते आणि काही होमगार्ड यांनी सहभाग घेतला होता.

जिल्ह्यातून होत असलेली अंतरराज्य अंमली पदार्थ तस्करी रोखण्यासाठी पोलिसांकडून पुढील काळातही विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिली आहे. या कारवाईमुळे अंमली पदार्थ तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे. पथकाचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांनी कौतुक केले.

# महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीला विरोधी पक्षांमुळेच विलंब –आ. श्रीजया चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)** –संसदेच्या नुकत्याच झालेल्या विशेष अधिवेशनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील 'रालोआ' सरकारने मांडलेली विधेयके मंजूर झाली असती, तर २०२९ च्या निवडणुकीपासूनच लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाले असते. मात्र, विरोधी पक्षांच्या विरोधामुळे या प्रक्रियेला विलंब झाला आहे, असा आरोप आमदार श्रीजया चव्हाण यांनी केला.



महिला आरक्षणासंदर्भात बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'न्वये महिलांना २०२९ पासून आरक्षण लागू करण्याच्या केंद्र सरकारच्या पावलांचे त्यांनी समर्थन केले आणि विरोधी पक्षांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आमदार चव्हाण म्हणाल्या की, भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे; परंतु भारतीय संसदेत महिला खासदारांचे प्रमाण अनेक लहान देशांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. जगभरातील संसदेत महिलांचे सरासरी प्रमाण २७.५० टक्के आहे. रवांडा, क्युबा, निकारागुआ, बोलिव्हिया, मेक्सिको आणि युएईसारख्या देशांत ५० टक्क्यांहून अधिक महिला प्रतिनिधी आहेत. आशियाई देशांमध्ये हेच प्रमाण २२ ते २४ टक्के असताना भारताच्या लोकसभेत केवळ १४ टक्के महिला खासदार आहेत. त्यांनी पुढे नमूद केले की, १९५२ मध्ये पहिल्या लोकसभा निवडणुकीत ४.४ टक्के महिला निवडून आल्या होत्या. आज ७४ वर्षांनंतर आपण केवळ १४ टक्क्यांपर्यंत पोहोचलो आहोत. याच वेगाने ३३ टक्क्यांचे उद्दिष्ट गाठायचे असेल, तर कदाचित आणखी १०० वर्षे लागतील. विरोधी पक्ष भारतीय महिलांना इतकी प्रदीर्घ प्रतीक्षा करायला लावणार आहेत का? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

केंद्र सरकारने राज्यातील लोकसभा मतदारसंघांची संख्या सरसकट ५० टक्क्यांनी वाढवण्याचा प्रस्ताव मांडला होता. यामुळे कोणत्याही राज्याचे प्रतिनिधित्व कमी न होता मतदारसंघांचा विस्तार आणि मतदार संख्या कमी झाली असती. आज देशातील काही मतदारसंघात तब्बल ३८ लाख मतदार आहेत. मतदारसंघांची संख्या वाढली असती तर प्रशासकीय सुलभता आली असती, नवीन नेतृत्वाला संधी मिळाली असती आणि पुढील निवडणुकीपासूनच महिला आरक्षण लागू झाले असते. मात्र, विरोधी पक्षांच्या तर्कहीन विरोधामुळे हा प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही, असे त्या म्हणाल्या.

## नंदिग्राम एक्स्प्रेसमधील बंद एसीमुळे प्रवाशी संतप्त

**किनवट (प्रतिनिधी)** –बल्लारशाह - मुंबई नंदिग्राम एक्स्प्रेसमधील एसी बुधवार, दि.२२ रोजी बंद पडल्याने रणरणत्या उन्हात प्रवाशांचे हाल झाले. संतप्त प्रवाशांनी वरिष्ठांकडे तक्रार करूनही उशिरापर्यंत एसी बंदच होती.

नंदिग्राम एक्स्प्रेस बुधवारी किनवट रेल्वे स्थानकात सुमारे अडीच तास उशिराने पोहोचली. त्यातच एसी कोचमधील एसी बंद असल्याने रुग्ण, वृद्ध आदी प्रवाशांना घामाघुम होत प्रवास करावा लागला. सायंकाळी ४ वाजून १० मिनिटांनी सुटल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला.

याबाबत रेल्वे कर्मचाऱ्यांना माहिती देऊनही तत्काळ दखल घेतली गेली नसल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. महागडी एसी तिकिटे काढूनही अपेक्षित सुविधा मिळत नसल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला.

## पिस्तूल व काडतुसांसह एकास अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहरात फरार व पाहिजे आरोपींच्या शोधात कोम्बिंग ऑपरेशन अंतर्गत गस्त सुरू केली. या गस्त दरम्यान शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका युवकाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुस जप्त करण्यात आले आहे.



मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी रात्री ११ वाजल्यापासून ते दि. २२ एप्रिलचे पहाटे ३ वाजेपर्यंत नांदेड शहरात कोम्बिंग ऑपरेशनचे आयोजन करून अवैध पिस्तुल (अग्नीशस्त्र) बाळगणाऱ्या आरोपींची माहिती काढून कारवाई करण्याबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे कारवाई करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांना आदेशीत केले होते. दि. २२ एप्रिल रोजी सपोनि विठ्ठल घोगरे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना गोपनीय माहिती मिळाली की, व्हीआयपी रोड ते गोकुळनगर जाणाऱ्या रोडच्या कडेला विसावा गार्डनच्या वॉल कंपाउन्डलगत एक युवक हा विक्री करण्याच्या उद्देशाने गावठी पिस्तुल बाळगून असल्याची माहिती मिळाल्याने मिळालेल्या माहितीप्रमाणे एम.एच.२६ रोडवर छापा कारवाई केली असता सदर ठिकाणी निलेश रावसाहेब गोरठेकर (वय २५ वर्ष, रा. गणपती मंदिराजवळ, बाबानगर नांदेड) हा मिळून आला.

त्यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात गावठी पिस्तुल व दोन जिवंत काडतुस (किंमत ४१,४००) रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. त्यास गावठी पिस्तुलबाबत विचारपूस केल्यानंतर त्याने गावठी पिस्तुल त्याचा मित्र दत्ता भारती रा. सिडको नांदेड (सध्या कारागृहात) याच्यासोबत जाऊन खांडवा राज्य मध्यप्रदेश येथून खरेदी केले असल्याचे सांगितले.



**नांदेड** –येथील प्रथमेश सविता शशिकांत देशमुख या एमबीबीएसच्या विद्यार्थ्याला भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांच्या उपस्थितील अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्या हस्ते १ लाख रुपयांची मदत देशमुख कुटुंबाकडे सुपूर्द करण्यात आली. या प्रसंगी विजय जोशी, कृष्णा उमरीकर, बजरंग शुक्ला, प्रल्हाद कांबळे, प्रा. संतोष कुलकर्णी, रमेश देवडे, किरण कुलकर्णी, प्रशांत गवळे, संतोष क्षीरसागर आदी पत्रकार बांधव उपस्थित होते. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

## डॉ. बी. आर. आंबेडकर फाऊंडेशनचा २५ एप्रिल रोजी कृष्णाई पुरस्कार वितरण सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** डॉ. बी. आर. आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी भीमजयंतीच्या निमित्ताने देण्यात येणाऱ्या कृष्णाई पत्रकारिता व समता गौरव पुरस्काराचे वितरण शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ रोजी एका शानदार सोहळ्यात होणार आहे.

२५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता आयटीआय जवळील हॉटेल ताज पाटील येथील सभागृहात होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माहूर- किनवटचे आ. भीमराव केराम हे राहणार आहेत. पुरस्काराच्या वितरणासाठी पीआरपीचे राष्ट्रीय अध्यक्ष जोगेंद्र कवाडे, आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, माजी आ. सुभाष वानखेडे, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बाबुराव कोहळीकर, मनपा सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश प्रवक्ते फारुख अहेमद, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बापूराव गजभारे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

पुरस्कार सोहळ्यात प्रा. डॉ. लक्ष्मीकांत तांबोळी (समता गौरव पुरस्कार), मिकी घई, मुक्तेश्वर पाटील, विजय होकर्णे, डॉ. मनोज गिमेकर, अतुल राजूरकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. या सोहळ्यात मनपातील आंबेडकरी समाजाच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार देखील करण्यात येणार आहे, अशी माहिती संयोजक तथा संस्थेचे सचिव आकाश गजभारे यांनी दिली.

## चतुराबाई लोमटे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – हदगाव तालुक्यातील चुंचा येथील रहिवासी श्रीमती चतुराबाई सुभानराव लोमटे यांचे २२ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. केंब्रिज महाविद्यालयाचे संचालक डॉ. गजानन लोमटे, जगदंबा महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष लोमटे यांच्या आई तर प्राचार्या डॉ. दीपाली अंभोरे यांच्या त्या सासू होत.

## उनकेश्वर येथील उच्च पातळी बंधाऱ्याच्या कामात गैरव्यवहार?

**किनवट (प्रतिनिधी)** –श्रीक्षेत्र उनकेश्वर येथील पैनगंगा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्याचे काम पाटबंधारे विभागाच्यावतीने सुरू असून, या कामात गैरव्यवहार होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांसह ग्रामस्थांनी केला आहे.

उनकेश्वर येथील पैनगंगा नदीवर उच्च पातळी बंधाऱ्यासाठी शासनाने मंजुरी दिली. त्यानंतर बंधारा निर्मितीच्या कामाला सुरुवात झाली. सध्या पुलाचे पिलर उभारण्याचे काम सुरू आहे. मात्र, कडक उन्हाळा असूनही पिलरच्या मजबुतीसाठी आवश्यक असलेले क्युरींग (पाणी मारणे) पूर्णपणे बंद आहे. पिलरला साधे ओले पोतेही गुंडाळलेले नाहीत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही सरकारी कामाच्या ठिकाणी कामाचा तपशील, खर्च आणि कंत्राटदाराचे नाव असलेला माहिती फलक लावणे बंधनकारक असते. मात्र, या ठिकाणी असा कोणताही फलक नसल्याने हे काम गुप्त पद्धतीने का उरकले जात आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या कामाच्या आडून परिसरात रेती माफियांचे चांगलेच फावले आहे. विदर्भ व मराठवाड्याच्या सीमेवर सायफळ येथून दररोज रात्री १२ ट्रॅक्टरच्या साहाय्याने शेकडो ब्रास रेतीची अवैध वाहतूक सुरू आहे. विशेष म्हणजे, महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या 'आशीर्वादाने' हा व्यवहार खुलेआम सुरू असल्याची चर्चा परिसरात आहे. कंत्राटदाराला रेती पुरवण्यासाठी गावागावांत दलाल सक्रिय झाले असून, या अवैध रेतीमुळे शासनाचा महसूल तर बुडतच आहे, पण कामाचा दर्जाही खालावत आहे. पुलाच्या निकृष्ट कामाबाबत उनकेश्वर येथील सरपंच पुंडलिक गेडाम यांनी कनिष्ठ अभियंता कंचर्लावार यांच्याकडे तक्रार केली असता, त्यांनी समाधानकारक उत्तर देण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे दिली.

## नांदेड शहरात मध्यरात्री कोंबिंग ऑपरेशन राबवून गुन्हेगारांची धरपकड; १२५ हून अधिक जणांवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात चोरी आणि इतर अवैध गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली 'ऑपरेशन फ्लश आऊट' राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत गेल्या १० दिवसांत १२५ पेक्षा जास्त सराईत गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली असून, ऑन रेकॉर्ड असलेल्या अनेक आरोपींची कसून तपासणी आणि राउंडिंग अप सुरू करण्यात आले आहे. मंगळवारी रात्री ११ वाजेपासून बुधवारी पहाटे ३ वाजेपर्यंत शहरात विशेष कोंबिंग ऑपरेशन राबवून गुन्हेगारांची मोठी झाडाझडती घेण्यात आली.



या मोहिमेमध्ये अपर पोलीस अधीक्षक (भोकर), उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा आणि शहरातील विविध पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व अंमलदार अशा एकूण २७ अधिकाऱ्यांसह ९८ कर्मचाऱ्यांचा ताफा सहभागी झाला होता. यामध्ये प्रामुख्याने सोनखेड आणि उस्माननगर पोलीस ठाण्यांच्या पथकांनीही सक्रिय सहभाग नोंदवत शहरातील संवेदनशील भागांत शोधमोहीम राबवली. कोंबिंग ऑपरेशन दरम्यान पोलिसांनी तडीपार केलेले ४१ गुन्हेगार, MPD अंतर्गत सुटलेले २६ गुन्हेगार आणि शरीरिक इजा पोहोचविणारे गुन्हे करणारे ५५ सराईत गुन्हेगार तपासून पाहिले. यामध्ये अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांवर कारवाई करताना आर्म्स ॲक्ट अंतर्गत ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १२२ अन्वये २ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. तसेच, भाग्यनगर पोलीस ठाण्यातील एका पाहिजे असलेल्या आरोपीलाही या मोहिमेत अटक करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांतील कारवाईचा आढावा घेतल्यास, ६ एप्रिल ते २१ एप्रिल या कालावधीत मोठ्या प्रमाणात गुन्हेगारांची तपासणी झाली आहे. हद्दपार केलेल्या व्यक्तींची तपासणी करताना ८ आरोपी शहरातच मिळून आल्याने त्यांच्यावर कलम १४२ प्रमाणे गुन्हे दाखल केले आहेत.

## धम्म निरंजन केंद्र व वृत्तपत्र कार्यालयातील चोरीचा छडा; २ आरोपी गजाआड

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरात घरफोडी आणि चोरीच्या घटनांनी डोकेदुखी वाढवलेली असतानाच, स्थानिक गुन्हे शाखेने शिताफीने तपास करत दोन महत्त्वाचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. धम्म निरंजन विपश्यना केंद्र आणि एका वृत्तपत्राच्या कार्यालयात झालेल्या चोरी प्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून चोरीचा पूर्ण ५८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील चोरीचे गुन्हे उघड करण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी विशेष पथके तयार केली होती. दि. २० एप्रिल रोजी पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे व त्यांच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली की, काही संशयित देगलूर नाका येथील नेकलेस रोडवर चोरीच्या पैशांची वाटणी करत आहेत. या माहितीवरून



पोलिसांनी सापळा रचून राजू श्रावण पवार (वय २६, रा. चौफाळा) आणि मोहम्मद सईद मोहम्मद युसूफ (वय ६५, रा. रज्जानगर) यांना ताब्यात घेतले. आरोपींची कसून चौकशी केली असता, राजू पवार याने नवीन डंकीन परिसरातील धम्म निरंजन विपश्यना केंद्रातील सीसीटीव्ही कॅमेरे व इतर साहित्य, तसेच एमआयडीसी भागातील एका वृत्तपत्राच्या प्रेस कार्यालयातील मोकळ्या जागेतून सोलर व इतर भंगार सामान चोरल्याची कबुली दिली.

## आ. बोंढारकर यांच्या हस्ते २० कोटी ७० लक्ष रुपयांच्या कामांचे लोकार्पण

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमध्ये आ. आनंदराव बोंढारकर यांच्या निधीतून पूर्णत्वास आलेल्या विकास कामांचे लोकार्पण आ. बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील बाभुळगाव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत रु. २० लाखांच्या पेव्हर ब्लॉक, जयसिंग तांडा येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत रु. २५ लाख, राजू तांडा येथे रु. २० लाख, हेमला तांडा येथे रु. २५ लाखांचे फेवर ब्लॉक बसविण्याचे काम पूर्ण झाले आणि धनगरवाडीतील अण्णाभाऊ साठे नगरात अनु.जाती व नवबौद्ध वस्ती योजनेअंतर्गत रु. ५ लक्ष रुपयांच्या सी.सी.रस्त्याचे बांधकाम, अण्णाभाऊ साठे नगर येथे रु.५ लक्ष रुपयांचे सिमेंट नाली बांधकाम, खंडोबा मंदिर परिसर येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत रु. ४ लक्ष रुपयांचे पेव्हर ब्लॉक बसविणे, जयमल्हार नगर येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत रु.१५ लक्ष रुपयांचे पेव्हर ब्लॉक बसविणे, जुनेगाव वस्ती येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत रु.९



लक्ष रुपयांचे पेव्हर ब्लॉक बसविणे, खंडोबानगर येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत रु.१५ लक्ष रुपयांचे पेव्हर ब्लॉक बसविणे, अहिल्यादेवी होळकरनगर येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत रु. २० लक्ष रुपयांच्या सी.सी. रस्ता बांधकाम तसेच अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या शेवडी–सोनखेड रोडचे भूमिपूजन करण्यात आले.

सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड अंतर्गत पेनूर–शेवडी–सोनखेड- कलंबर- बारुळ रस्त्याची सुधारणा करणे रु.१८ कोटी रुपयांच्या या कामाचेही आ. बोंढारकर यांनी भूमिपूजन केले. तसेच दगडगाव येथील श्री खंडोबा मंदिर येथे आमदार निधीअंतर्गत रु.१० लक्ष रुपयांच्या सभागृह बांधकामाचे भूमिपूजन, जय मल्हार नगर येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत रु.७ रुपयांच्या सी.सी रस्ता लोकार्पण, शिवमल्हार नगर येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत रु.७ लक्ष रुपयांच्या सी.सी. रस्त्याचे लोकार्पण, गावाचा मुख्य रोड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर योजनेंतर्गत रु.२० लक्ष रुपयांच्या सी.सी.रस्त्याचे लोकार्पण, पंचशील नगर येथे अनु. जाती व नवबौद्ध योजनेंतर्गत रु. ४ लक्ष रुपयांच्या विद्युतीकरण लोकार्पण, लहुजीनगर येथे अनु.जाती व नवबौद्ध योजनेंतर्गत रु.१० लक्ष रुपयांच्या पेव्हर ब्लॉक बसविणे यांसह अन्य विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com